रविवार, १६ जानेवारी २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक १८०
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग
विमानतळाला 'दिबां'चे नाव देण्यासाठी भूमिपुत्रांचा निर्धार/३
अर्थविषयक घडामोडींचा वेध घेणारे सदर अर्थप्रहर/४
पुजारा, रहाणेला आगामी मालिकेत मिळणार डच्चू?/६

## १६ जानेवारी राष्ट्रीय स्टार्टअप दिन म्हणून होणार साजरा



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी (दि. १५) देशातील १५० स्टार्टअप्स उद्योजकांसोबत संवाद साधला. या वेळी त्यांनी दरवर्षी १६ जानेवारी हा दिवस 'राष्ट्रीय स्टार्ट-अप दिन' म्हणून साजरा केला जाणार असल्याची घोषणा केली. स्टार्टअपची संस्कृती देशात सर्वत्र पोहचण्यासाठी हा दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या संवादात विविध क्षेत्रांतील स्टार्टअप्स सहभागी झाले होते. स्टार्टअप्स देशात नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून राष्ट्रीय गरजांमध्ये कसे योगदान देऊ शकतात हे समजून घेणे हा या संवादाचा उद्देश होता. जे स्टार्टअपच्या जगात भारताचा झेंडा उंचावत आहेत त्या सर्व स्टार्टअप उद्योजकांचे, तसेच कल्पक तरुणांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या वेळी अभिनंदन केले.

# शिवसेना-राष्ट्रवादीतील संघर्ष चव्हाट्यावर

## ठाण्यात उड्डाणपुलाच्या श्रेयवादावरून कार्यकर्त्यांची घोषणाबाजी

**ठाणे : प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या खारेगाव येथील रेल्वे क्रॉसिंगवर उभारण्यात आलेल्या उड्डाणपुलाचे लोकार्पण शनिवारी (दि. १५) झाले, पण यावरून शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये श्रेयवादावरून संघर्ष उफाळून आला.



शिवसेना नेते आणि नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या पुलाचा लोकार्पण सोहळा होणार असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठपुराव्यामुळे काम पूर्णत्वास गेले, असा दावा करीत आमचे प्रदेशाध्यक्ष आणि मंत्री जयंत पाटील यांच्या हस्ते पुलाचे लोकार्पण व्हावे, अशी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांची इच्छा होती. त्यामुळे कार्यक्रमस्थळी शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांची गर्दी झाली होती.

राष्ट्रवादीचे नेते व गृहनिर्माणमंत्री जितेंद्र आव्हाड कार्यक्रमस्थळी येताच या वेळी राष्ट्रवादीकडून जितेंद्र आव्हाड आगे बढोच्या, तर शिवसेनेकडून कोण आला रे कोण आला शिवसेनेचा वाघ आला अशी घोषणाबाजी करण्यात येत होती. यामुळे परिसरात तणावाचे वातावरण होते.

अखेर आव्हाड आणि शिंदे यांनी कार्यकर्त्यांना शांत केले, पण या कार्यक्रमाच्या निमित्ताने शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये संघर्ष पाहावयास मिळाला. त्यामुळे दोन्ही पक्ष महाविकास आघाडी सरकारमध्ये एकत्र असले, तरी त्यांच्यात स्थानिक पातळीवर आलबेल नसल्याचे पुन्हा एकदा समोर आले.

## रायगड पोलीस दलात कोरोनाचा विस्फोट

### ६० जणांना लागण

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड पोलीस दलात कोरोनाचा मोठ्या प्रमाणावर शिरकाव झाला आहे. जिल्ह्यातील सहा पोलीस अधिकारी आणि ५४ कर्मचाऱ्यांना कोरोनाची लागण झाली आहे. त्यामुळे चिंता व्यक्त करण्यात येत आहे.

कोरोनाची लागण झालेल्यांमध्ये पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांचाही समावेश आहे. या सर्वांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी दिली.

एवढ्या मोठ्या संख्येने पोलीस कोरोना पॉझिटिव्ह आढळल्याने यंत्रणा सतर्क झाली आहे. पोलीस अधीक्षक कार्यालयासह सर्व पोलीस ठाण्यांमध्ये सर्व अधिकारी, कर्मचारी यांची अँटीजेन चाचणी केली जात आहे, तसेच विशेष खबरदारी घेण्यात येत आहे.

## पेण अर्बन बँकेमध्ये अडकलेल्या पैशांसाठी कर्जतमध्ये सह्यांची मोहीम

**कर्जत : बातमीदार**

पेण अर्बन बँकेत शेकडो ठेवीदार, खातेदारांचे पैसे अडकले आहेत. गेली ११ वर्षे बँक संघर्ष समितीच्या माध्यमातून आंदोलने केली जात आहेत. या लढ्याचा एक भाग म्हणून शनिवारी (दि. १५) कर्जतमध्ये सह्यांची मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत तब्बल १३०० नागरिकांनी सह्या करून आपला पाठिंबा दिला.



(छाया : संतोष पेरणे)

केंद्र सरकारने केलेल्या कायद्याप्रमाणे पाच लाखांच्या ठेवीपर्यंत संरक्षण देण्यात आले आहे. त्याच आधारे पेण अर्बन बँकेच्या ठेवीदारांना संरक्षित करून त्यांचे पैसे परत द्यावे यासाठी सुनील गोगटे यांच्या पुढाकाराने कर्जत शहरातील लोकमान्य टिळक चौकात सह्यांची मोहीम राबविण्यात आली.

या वेळी संजय कराळे, बळवंत घुमरे, प्रकाश पालकर, मयूर शितोळे, स्नेहा गोगटे, प्रीती तिवारी, विजय कुलकर्णी, दिनेश गणेगा, सर्वेश गोगटे, सूर्यकांत गुप्ता, रजनी वैद्य, संगीता समीर सोहोनी, सागर खडे, गोडबोले, दिनू वैद्य आदी उपस्थित होते.

# उरण मतदारसंघाचे दमदार आमदार महेश बालदी यांचा धडाका

## मोहपेत नळ पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघाचे दमदार आमदार महेश बालदी यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील जलजीवन मिशन अंतर्गत पनवेल तालुक्यातील मोहपे येथे साकारणाऱ्या ५० लाख रुपयांच्या नळ पाणीपुरवठा योजनेचा भूमिपूजन सोहळा मोठ्या उत्साहात शनिवारी (दि. १५) झाला.

वास्तविक आमदार महेश बालदी यांनी पाठपुरावा करून ही योजना अमलात आणली असताना त्याचे श्रेय लाटण्याचा केविलवाणा प्रयत्न माजी आमदार मनोहर भोईर, आमदार बाळाराम पाटील यांनी केला, मात्र नागरिकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न हाणून पाडला असून येथील ग्रामस्थांनी केंद्र सरकार, तसेच आमदार महेश बालदी यांचे आभार मानले.

देशातील ग्रामीण भाग पिण्याच्या पाण्याने समृद्ध करण्यासाठी जलजीवन मिशन ही केंद्र सरकारची एक महत्त्वपूर्ण योजना आहे. (पान २ वर..)



## चौक येथील ग्रामीण रुग्णालयाला रुग्णवाहिकेसह यंत्रसामग्रीचे लोकार्पण

**चौक :** उरण विधानसभा मतदारसंघाचे कार्यतत्पर आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक विकास निधी अंतर्गत ५१ लाखांची यंत्रसामग्री खालापूर तालुक्यातील चौक ग्रामीण रुग्णालयात देण्यात आली असून त्याचे लोकार्पण शनिवारी (दि. १५) झाले.

चौक हा ग्रामीण विभाग असून येथे मोठ्या प्रमाणात आदिवासी व गरीब गरजू लोकांची वस्ती आहे. त्यांना योग्य ते उपचार व येण्या-जाण्यासाठी लागणाऱ्या रुग्णवाहिकेसह अन्य सामग्री आमदार महेश बालदी यांनी स्थानिक विकास निधी अंतर्गत दिली आहे. (पान २ वर..)

## निवडक

### यूपी विधानसभा निवडणुकीसाठी भाजपची पहिली यादी जाहीर

**लखनऊ :** उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने आपल्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे.



त्यानुसार मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ गोरखपूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत. मथुरा मतदारसंघातून ऊर्जामंत्री श्रीकांत शर्मा यांना पक्षाने तिकीट दिले आहे, तर उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य प्रयागराजच्या सिरथू मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत.

### आणखी एका एमपीएससी उमेदवाराची पुण्यात आत्महत्या

**पुणे :** एमपीएससी परीक्षेची तयारी करणाऱ्या आणखी एका उमेदवाराने आत्महत्या केल्याची घटना पुण्यात समोर आली आहे. अमर मोहिते असे आत्महत्या केलेल्या उमेदवाराचे नाव असून तो मूळचा सांगलीचा रहिवासी असल्याचे सांगितले जात आहे. तो पीएसआय फिजिकलची तयारी करीत होता, मात्र मराठा आरक्षण रद्द झाल्यापासून तो तणावात होता.



## पनवेलच्या रोहिदास वाड्यातील कामांची सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडून पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील रोहिदास वाडा येथे महापालिकेच्या वतीने समाज मंदिर उभारण्याचे काम सुरू आहे. या समाजमंदिराच्या कामाची महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शनिवारी (दि. १५) अधिकाऱ्यांसह पाहणी केली. या वेळी त्यांनी या कामाचा आढावा घेऊन अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या, तसेच या वेळी त्यांनी परिसरातील गटारे आणि रस्त्यांच्या कामाचीही पाहणी केली.

पनवेल महापालिकेमार्फत अनेक विकासाची कामे महापालिका क्षेत्रात सुरू आहेत. त्यानुसार प्रभाग क्रमांक १९मधील रोहिदास वाडा येथे समाजमंदिर उभारण्याचे काम सुरू आहे. या मंदिराच्या कामाची सभागृह नेते परेश ठाकूर यांनी पाहणी करून आढावा घेतला, तसेच या वेळी त्यांनी आजूबाजूच्या परिसरातील गटारे, अशोका गार्डन परिसरातील गटारांची पाहणी, तथास्तू हॉलजवळील परिसरातील रस्त्याची कामे आणि पंचरत्न सर्कल येथील नाल्याची पाहणी अधिकाऱ्यांसोबत केली. (पान २ वर..)

## विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर आज पोलादपूर दौऱ्यावर

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर रविवारी (दि. १६) पोलादपूर दौऱ्यावर येत आहेत. दरेकर यांच्या उपस्थितीत पोलादपूर नगरपंचायत निवडणुकीच्या प्रचाराची रॅली होणार आहे.



विरोधी पक्षनेते दरेकर सकाळी १०.३० वा. शिवाजी नगर येथे वॉर्ड क्र.१४ येथील निवडणूक प्रचार रॅलीमध्ये सहभागी होणार आहेत. त्यानंतर सकाळी ११.३० वा. वॉर्ड क्र.२मध्ये हनुमाननगर, सरकारी दवाखान्याशेजारी आयोजित प्रचार रॅलीमध्ये उपस्थित राहणार आहेत. दुपारी ३ वा. वॉर्ड क्र. ८मधील सैनिकनगर येथील व वॉर्ड क्र. १०मधील मठ गल्ली येथे आयोजित प्रचार रॅलीमध्ये दरेकर सहभागी होणार आहेत. शेवटी सायंकाळी ५.३० वा. विरोधी पक्षनेते दरेकर यांची राजू धुमाळ यांचे निवासस्थान, ५४६, मातोश्री, गोकुळ नगर, पोलादपूर येथे पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली आहे.



**पनवेल :** जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या गव्हाण कोपर येथील मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व तुकाराम नारायण घरत महाविद्यालयाचा इयत्ता पाचवीतील विद्यार्थी कल्पक माणिक घरत याला शासकीय शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते कल्पकचा सत्कार करण्यात आला. या वेळी जेबीएसपी संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख आणि कल्पकचे पालक उपस्थित होते. (वृत्त पान २ वर..)

## विराट कोहलीने कसोटी संघाचेही कर्णधारपद सोडले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी मालिकेतील पराभवानंतर विराट कोहलीने भारतीय कसोटी संघाचे कर्णधारपद सोडले आहे. भारतीय संघाने या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली होती, परंतु पुढील दोन्ही कसोटींमध्ये आफ्रिकेने दमदार कमबॅक करून मालिका २-१ अशी जिंकली.

ट्वेंटी-२० वर्ल्डकप स्पर्धेपूर्वी विराट कोहलीने ट्वेंटी-२० संघाचे नेतृत्वपद सोडण्याची घोषणा केली. त्यानंतर बीसीसीआयने वन डे संघाच्या कर्णधारपदावरून त्याची हकालपट्टी केली आणि शनिवारी (दि. १५) त्याने कसोटी संघाचेही नेतृत्व सोडले. ट्वीट करून त्याने ही माहिती दिली.






# कामोठ्यातील विद्युत समस्यांसंदर्भात बैठक

## सभागृह नेते परेश ठाकूर यांची एमएसईबी अधिकाऱ्यांशी चर्चा

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

शहरामध्ये विद्युत पुरवठ्यासंदर्भातील नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांबाबत सभागृह नेते परेश ठाकूर यांनी कामोठे येथे एमएसईबीचे सहाय्यक अभियंता गौतम सूर्यवंशी यांची शुक्रवारी (दि. १४) भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. या वेळी सेक्टर २५मधील सोल्जर सोसायटीसमोरील ओव्हरहेड केबल भूमिगत करण्याबाबतच्या दिलेल्या निवेदनासंदर्भात चर्चा करण्यात आली, तसेच गौतम सूर्यवंशी यांनी लवकरात लवकर काम पूर्ण करू, असे आश्वासन दिले.



कामोठे परिसरातील एमएसईबी संदर्भात असलेल्या समस्यांबाबत पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीत, फॉल्टी मीटर, ओव्हरहेड वायर भूमिगत करणे, ट्रान्सफॉर्मर जवळील स्वच्छता करणे, तसेच इतर समस्यांबाबत करण्यात आलेल्या मागण्यांसंदर्भात सकारात्मक चर्चा झाली. या वेळी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी अधिकाऱ्यांना जलद कारवाई करत या सर्व समस्या लवकरात सोडवाव्या, अशी सूचना केली. त्यानुसार एमएसईबीचे सहाय्यक अभियंता गौतम सूर्यवंशी यांनी या सर्व समस्या लवकरात लवकर सोडवून या संदर्भात सिडको अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊ, असे आश्वासन दिले.

या वेळी महापालिकेच्या प्रभाग समिती 'क'च्या सभापती अरुणा भगत, नगरसेवक विजय चिपळेकर, विकास घरत, भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवी जोशी, प्रदीप भगत, सुयोग वाफारे, स्वाती केंद्रे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.



**पनवेल : महापालिकेच्या प्रभाग समिती 'ड'च्या नवनिर्वाचित सभापती अ‍ॅड. वृषाली वाघमारे यांनी प्रभाग समिती कार्यालयात शुक्रवारी आपला पदभार स्वीकारला. त्याबद्दल सभागृह नेते परेश ठाकूर यांनी वाघमारे यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी नगरसेवक अनिल भगत, मनोज भुजबळ, माजी उपमहापौर व नगरसेविका चारुशीला घरत, दर्शना भोईर, रुचिता लोंढे, राजेश्री वावेकर, सुशीला घरत, जितेंद्र वाघमारे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयूरेश नेतकर, शैला आंबेकर, स्मिता वाणी, अशोक आंबेकर, योगेश लांडगे, हेमांगी वाघमारे, प्राजक्ता वाघमारे आदी उपस्थित होते. या सर्वांनीही वाघमारे यांना शुभेच्छा दिल्या.**

## बापाने केला मुलीचा विनयभंग

**पनवेल :** खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत बापानेच मुलीचा विनयभंग केल्याची घटना घडली आहे. आरोपीविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २२ वर्षीय तरुणी ही आपल्या वडिलांसोबत राहते. वडिलांनी तिला मारहाण करून धमकी दिली व तिचा विनयभंग केला.

## मृत अर्भक आढळले

**पनवेल :** तालुक्यातील मोहोचापाडा येथील अंगणवाडीच्या बाजूला एक दिवसाचे मृत स्त्री अर्भक आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.



## उपमहापौर सीताताई पाटील यांनी केली खांदेश्वर शिवमंदिर तलावाची पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

परिसरातील खांदेश्वर शिवमंदिर येथील तलावाची उपमहापौर सीताताई सदानंद पाटील यांनी शनिवारी (दि. १५) पाहणी केली.

खांदेश्वर तलाव परिसरात सुरक्षा भिंत असून या ठिकाणी सुरक्षा रक्षकही तैनात आहेत. असे असतानाही काही बेशिस्त नागरिक तलावाच्या बाहेरच्या सुरक्षा भिंतीवरून व सुरक्षा रक्षकावर अरेरावी करत तलावात निर्माल्य टाकतात. त्यामुळे तलावाचे सौंदर्य व परिसर अस्वच्छ होत आहे. याबाबत उपाययोजना करण्यासाठी तलावाच्या भोवतालच्या भिंतीवर तारेचे कुंपण बांधावे. जेणेकरून तलावात कोणीही निर्माल्य फेकणार नाही, अशी मागणी उपमहापौर सीताताई पाटील यांच्याकडून करण्यात आली आहे. याबाबत त्यांनी सिडकोकडे वारंवार पाठपुरावा देखील केला आहे. शनिवारी खांदेश्वर शिवमंदिर तलाव परिसराची पाहणी करून उपमहापौर सीताताई पाटील यांनी परिस्थितीचा आढावा घेतला, तसेच याबाबत सिडकोकडे पुन्हा एकदा पत्रव्यवहार करून तलाव परिसराच्या संरक्षण भिंतीवर तारेचे कुंपण बांधण्याची मागणी करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. या वेळी सोबत भीमराव पवार, सदानंद पाटील, अभिषेक भोपी, दशरथ म्हात्रे, श्री. लोखंडे आदी उपस्थित होते.

## उरण मोरा येथे घराला आग | पती-पत्नी किरकोळ भाजले

**उरण : वार्ताहर**

उरण नगर परिषद हद्दीतील मोरा कोळीवाडा, फड नं. १२ जवळ जगदिश हरी कोळी यांच्या घरातील गॅस लिकेजमुळे आग लागली. या वेळी पती व पत्नी हे किरकोळ भाजले. संपूर्ण घरातील सामान भस्मसात झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही.



मोरा कोळीवाडा येथील घर न. १०१८ या घरातील घरगुती लहान गॅस सिलिंडर लिकेज झाल्याने आग लागली असा प्राथमिक अंदाज आहे. या आगीत घरातील जगदिश हरी कोळी (वय ६२), वत्सला जगदिश कोळी (वय ६०) हे किरकोळ भाजले असून त्यांना उपचारासाठी उरण येथील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले आहे.

एनएडी फायर ब्रिगेड करंजा, ओएनजीसी फायर ब्रिगेड व सिडको (द्रोणागिरी) फायर ब्रिगेड यांनी घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली.

या वेळी उरण नगर परिषद उपनगराध्यक्ष जयविन कोळी, मुख्याधिकारी संतोष माळी व सर्व कर्मचारी, सिडको (द्रोणागिरी)चे उपअग्निशमन अधिकारी अमित कांबळी, अग्निशमन दलाचे के. टी. घरत, व्ही. जे. गोसावी, फायरमन प्रणित विचारे, किरण भोईर, ए. एन. गुलानी, ओएनजीसी फायर ब्रिगेडचे महावीर सिंग, एनएडी फायर ब्रिगेड करंजाचे अधिकारी जे. एस. वाघमारे, मोहन पाटील, फायरमन डी. एच. खडसने, पी. पी. मंडा, सी. डी. रोकडे, मोरा सागरी पोलीस ठाण्याचे कर्मचारी आदींनी आग विझवण्यासाठी प्रयत्न केले.

## 'वेसावची पारू'फेम शाहीर काशीराम चिंचय यांचे निधन

**मुंबई : प्रतिनिधी**

पारंपरिक कोळी गाण्यांचा बादशाह म्हणून ओळखले जाणारे शाहीर काशीराम चिंचय यांचे शुक्रवारी (दि. १४) पहाटे निधन झाले. ते ७१ वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते. केईएम रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात पत्नी हेमा, मुलगा सचिन आणि तीन विवाहित कन्या असा परिवार आहे. कोळी गीते सातासमुद्रापार लोकप्रिय करणारे लोकशाहीर म्हणून त्यांची ओळख आहे.



काशीराम चिंचय यांच्यावर सुरुवातीला अंधेरीतील ब्रह्मकुमारी रुग्णालयात उपचार सुरू होते, मात्र त्यानंतर त्यांना केईएम रुग्णालयात हलवण्यात आले. केईएम रुग्णालयात त्यांनी शुक्रवारी पहाटे अखेरचा श्वास घेतला. डोल डोलतंय वाऱ्यावर, डोंगराच्या आडून एक बाई चांद उगवला, वेसावची पारू, हीच काय गो गोरी गोरी पोरी, मी हाय कोली, सन आयलाय गो यांसारख्या अनेक कोळीगीतांचे ते गीतकार होते.

## पान १ वरून

### मोहपेत नळ पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन

वाढत्या लोकसंख्येसोबत जलसंकटही वाढत असून ही समस्या लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सन २०१९मध्ये स्वातंत्र्य दिनाच्या मुहूर्तावर एक भव्य योजना सुरू केली. त्या अनुषंगाने आमदार महेश बालदी यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून तब्बल ५० लाख रुपयांचा निधी मोहपे येथील नळ पाणीपुरवठा योजनेसाठी आणला.

या योजनेच्या कामाचा भूमिपूजन समारंभ शनिवारी आमदार महेश बालदी, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी गुळसुंदे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष डॉ. अविनाश गाताडे, राकेश गायकवाड, आत्माराम हातमोडे, माजी सरपंच आशा म्हसकर, युवा नेते प्रवीण ठाकूर, योगेश लहाने, अनिल पाटील, राजेश लबडे, तानाजी पाटील, महेंद्र गोजे, अनिल भोईर, अशोक भोईर, सचिन पाटील, वामन पवार, शंकर पवार, नामदेव पवार, आदेश पवार, सुनील दळवी, प्रकाश म्हसकर, उमेश पवार, चेतन पाटील, जगन पाटील, राकेश ठाकूर, संभाजी पाटील, हरी पवार, सखाराम पवार, दत्ता पवार, मंदार चोरघे, विनायक पवार, प्रतीक पवार, निखिल पवार, किसन पवार, विवेक पवार, शरद पवार, पांडुरंग पवार यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

### चौक येथील ग्रामीण रुग्णालयाला रुग्णवाहिकेसह यंत्रसामग्रीचे लोकार्पण

यामध्ये ड्युरा सिलिंडर तीन नग, जंबो सिलिंडर दहा नग, जनरेटर एक नग, मल्टीपरा मॉनिटर पाच नग, सेल काउंटर मशीन एक नग (३३.५० लाख रुपये) आणि रुग्णालयासाठी लागणारी सर्व सोयींनी युक्त रुग्णवाहिका (१७.५० लाख) सेवेसाठी दिली आहे.

या लोकार्पण सोहळ्यास माजी आमदार देवेंद्र साटम, भाजप खालापूर तालुका अध्यक्ष रामदास ठोंबरे, वैद्यकीय अधीक्षक मनोज बनसोडे, चौक जि. प. विभागीय अध्यक्ष गणेश मुकादम, माजी उपसरपंच गणेश कदम, ज्ञानेश्वर साखरे, तालुका कोषाध्यक्ष अरुण पारठे, वडगाव जि. प. विभागीय अध्यक्ष संदीप पाटील, केळवणे जि. प. विभागीय अध्यक्ष मंगेश वाकडीकर, तालुका कोषाध्यक्ष अरुण पारठे, दामू खैर, सुदेश महागावकर, पंकज शहा, मनोज साखरे, अश्विनी माळी, यशवंत जोशी, मोहन मुकादम, तालुका उपाध्यक्ष विद्याधर जोशी, विजय ठोसर, अनिल मुवड, स्वप्नील मुकादम, समीर मोरे, प्रकाश घोगरे यांच्यासह चौक परिसरातील पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

या वेळी आमदार महेश बालदी यांनी आपल्या मोजक्या शब्दांच्या मनोगतामध्ये म्हटले की, दिलेली मदत ही आमदार निधीतून असून त्याचा आदिवासी व गोरगरीब, गरजूंसाठी उपयोग व्हावा व त्यांना वेळेवर औषधोपचार मिळावे, तसेच त्यांना योग्य वेळी ये-जा करण्याकरिता अ‍ॅम्ब्युलन्स उपलब्ध व्हावी यासाठी आहे. जनसेवेसाठी मी नेहमीच तयार असेन. ग्रामीण भागात वेळोवेळी वीजपुरवठा खंडित होत असल्याने रुग्णांचे होणारे हाल टळावेत यासाठी आपण एक जनरेटर देत आहोत. त्याचाही गरजूंना उपयोग होईल, अशी अपेक्षा करतो.

### पनवेलच्या रोहिदास वाड्यातील कामांची सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडून पाहणी

या वेळी नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे, शहर अभियंता संजय कटेकर, आरोग्य निरीक्षक संजय जाधव, भाजप प्रभाग क्रमांक १९चे अध्यक्ष पवन सोनी, प्रवीण मोहोकर, मधुकर उरणकर, बाबाया जाधव, रजनिस जाधव, सचिन उरणकर, मंगेश पिळविलकर, सुधीर कटेकर आदी उपस्थित होते.

## कल्पक घरतला शासकीय शिष्यवृत्ती

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या येथील मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व तुकाराम नारायण घरत विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचा इयत्ता पाचवीचा विद्यार्थी कल्पक माणिक घरत याला शासकीय शिष्यवृत्ती मिळाली आहे. जिल्ह्याच्या यादीत कल्पकने २०६वा क्रमांक प्राप्त केला आहे.

कल्पकच्या या यशाबद्दल जेबीएसपी संस्थेचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी जेबीएसपी संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, कल्पकचे आजोबा काशिनाथ घरत, वडील माणिक घरत उपस्थित होते.

कल्पक हा 'रयत'च्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमधील प्रा. माणिक घरत यांचा चिरंजीव आहे. त्याला विद्यालयाच्या प्राचार्य साधना डोईफोडे, शिष्यवृत्ती विभागाच्या प्रमुख संपदा म्हात्रे, ऊर्मिला गोंधळी, राजश्री म्हात्रे, प्रणाली पाटील, उज्वला म्हात्रे, चारुशीला ठाकूर, प्रमोद कोळी, द्रौपदा वर्तक आदी अध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाच्या प्र. प्राचार्या प्रणिता गोळे, शिष्यवृत्ती विभागाचे प्रमुख पर्यवेक्षक अरुण जोशी व सर्व अध्यापकांचेही सहकार्य लाभले.

या यशाबद्दल कल्पकचे जेबीएसपी संस्थेचे अध्यक्ष व छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत, मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व टी. एन. घरत ज्युनिअर कॉलेज स्थानिक शाळा समितीचे चेअरमन भार्गव ठाकूर, प्राचार्य प्रणिता गोळे, अरुण जोशी, 'रयत'चे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी, रवींद्र भोईर, उपप्राचार्य जगन्नाथ जाधव, पर्यवेक्षक दीपक भर्णुके, प्रा. बाबूलाल पाटोळे आदींनी अभिनंदन केले.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे चेरवली, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे - चेरवली, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | जमीन भोगवटादाराचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) |
|---|---|---|---|---|
| चेरवली | अनुसया रामचंद्र भालेकर | ११ | ४/ब | ०-१८-०० |
| | रमेश रामचंद्र भालेकर | | | ०-०१-५० |
| | मुकुंद रामचंद्र भालेकर | | | |
| | शशिकांत रामचंद्र भालेकर | | | |
| | प्रमोद रामचंद्र भालेकर | | | |
| | शोभा दिलीप म्हात्रे | | | |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, वारसाहक्क, हुकुमनामा वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणाऱ्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**ता. १५/०१/२०२२**
**पनवेल**

सही/-
**अ‍ॅड. प्रधान मधुकर पाटील**
१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स,
ता. पनवेल, जि. रायगड
मोबाईल : ९३२४३७५५०२


## अवैधरीत्या डिझेलची विक्री करणारी टोळी जेरबंद

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने व राज्याच्या अन्न नागरी पुरवठा विभागाच्या दक्षता पथकाने उलवे येथील खाडी किनारी संयुक्तरीत्या कारवाई करून समुद्रातील जहाजामधून अवैधरीत्या डिझेल खरेदी करणारे व त्याची बेकायदा विक्री करणाऱ्या टोळीला अटक केली आहे.

या कारवाईत पोलिसांनी तब्बल २१ हजार ४७० लिटर (२१.४ टन) डिझेलसह डिझेलची विक्री करण्यासाठी वापरण्यात आलेल्या दोन बोटी असा एकूण ३५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याची माहिती नवी मुंबईचे पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंह यांनी दिली.

काही व्यक्ती समुद्रात असलेल्या जहाजातून अवैधरीत्या कमी किमतीत डिझेलची खरेदी करून त्याची बेकायदा विक्री करत असल्याची माहिती नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यानुसार बोटींवर बेकायदा डिझेलची साठवणूक करून त्याची विक्री करणाऱ्या सलीम अब्दुल हमीद शेख (५०), आसिफ नेमुद्दीन वलीयनी (४६), प्रवीण पंढरीनाथ नाईक (३४), विठ्ठल धोंडीबा देवकाते (१९) आणि दत्ता धोंडीबा देवकाते (२४) या पाच आरोपींना अटक केली. हे आरोपी समुद्रातील मोठ्या जहाजातून ६० रुपये लिटरप्रमाणे डिझेलची खरेदी करून ते डिझेल ७३ ते ७५ रुपये दराने विक्री करीत असल्याचे तपासात आढळून आले.


**पनवेल भाजपतर्फे**
**जनहितार्थ**
**माहितीसाठी**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**रविवार, दि. १६ जानेवारी २०२२ रोजी होणारे**
**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**
**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)**

१. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
२. जुने ग्रामीण रुग्णालय, कोळीवाडा-उरण नाका, पनवेल
३. आय. टी. एम. कॉलेज, नवीन पनवेल
४. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
५. यूपीएचसी-५, डी-मार्ट्या मागे, सेक्टर १५, खारघर
६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.

७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, से.२
८. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
९. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अँड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
१०. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
११. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
१२. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल ■ १३. न्यू इंग्लिश स्कुल, कळंबोली
१४. काळभैरव मंगल कार्यालय, कळंबोली

# विमानतळाला ‘दिबां’चे नाव देण्यासाठी भूमिपुत्रांचा निर्धार

## शेवटच्या श्वासापर्यंत भूमिका कायम राहील –दशरथदादा पाटील

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दिवगंत दि. बा. पाटील यांचे नाव देण्यासह प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित मागण्यांची पूर्तता व्हावी याकरिता नुकतीच (१३ जानेवारी) लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने पनवेल तालुक्यातील कोल्ही कोपर येथे भूमिपुत्र निर्धार परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत प्रमुख नेते, पदाधिकारी यांनी आपल्या भावना मांडल्या आणि विमानतळाला ‘दिबां’चेच नाव दिले पाहिजे या मागणीचा पुनरुच्चार केला, तर उपस्थित भूमिपुत्रांनी त्यास प्रतिसाद देत ‘दिबां’चे नाव विमानतळाला लागेपर्यंत लढण्याचा निर्धार केला. या वेळी ज्या मान्यवरांच्या भावना सर्वांपर्यंत पोहचवता आल्या नाहीत त्या आज मांडत आहोत. भूमिपुत्र परिषदेला कोरोना संसर्गामुळे कृती समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील उपस्थित राहू शकले नाही, पण त्यांनीही आपला संदेश देत आपण समस्त भूमिपुत्रांच्या पाठीशी असल्याचे सांगितले.

सर्वपक्षीय कृती समितीचे उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या परिषदेला केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले, माजी खासदार जगन्नाथ पाटील, संजीव नाईक, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार गणपत गायकवाड, आमदार महेश बालदी, माजी आमदार सुभाष भोईर, कॉ. भूषण पाटील, ‘दिबां’च्या सहकारी व कोल्हापूरच्या माजी नगरसेविका भारतीताई पोवार, माजी उपमहापौर जगदिश गायकवाड, तसेच नंदराज मुंगाजी, संतोष केणे, गुलाब वझे, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, दशरथ भगत, उपमहापौर सीता पाटील, सभागृह नेते परेश ठाकूर, राजाराम पाटील, जे. डी. तांडेल, राजेश गायकर, दीपक म्हात्रे, सुनील म्हात्रे, रूपेश धुमाळ, सदानंद वास्कर, कांचन घरत, सुनील पाटील, प्रशांत पाटील, गोवर्धन डाऊर, के. के. म्हात्रे, जयेश आक्रे, प्रेम पाटील, सीमा घरत यांच्यासह रायगड, ठाणे, मुंबई, नवी मुंबई, पालघर, कल्याण, डोंबिवली आदी विभागांतील भूमिपुत्र उपस्थित होते.

कृती समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील यांनी पुढे नमूद केलेय की, गेल्या काही काळापासून सुरू असलेला ओबीसींचा संघर्ष मोठ्या प्रमाणात पेटणार आहे ही भावना लक्षात घेऊन केंद्राने सर्वोच्च न्यायालयात ओबीसींना दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. यामुळे एक संघर्ष काही प्रमाणात शांत झाला आहे. दुसरीकडे कोकणचा भूमिपुत्र एन्रॉन ते नैना प्रकल्प, जेएनपीटी, सिडको, टोरोन्टो, रेती व्यवसाय, गावठाण विस्तार, गावठाणलगत असलेली वाढीव घरे, एमआयडीसी व औद्योगिकीकरणासाठी खरेदी केलेल्या भूमिपुत्रांच्या जमिनी, भांडवलदारांच्या घशात घालून भूमिपुत्रांना उद्ध्वस्त करणे, त्यांना बेरोजगार करणे, बेकारी व दारिद्र्य वाढविणे, रेतीचा वडिलोपार्जित व्यवसाय बंद पाडून देशोधडीला लावणे, राजकीय पुढाऱ्यांचे हस्तक बनविणे... असले प्रकार सुरू झाले आहेत.

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये ब्रिटिशांच्या संरक्षणासाठी नेवाळी विमानतळ उभारणीसाठी भूमिपुत्रांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या. काही जमिनी विकासाच्या नावाखाली संपादित करायच्या, पण त्या वापरात आणायच्या नाहीत, काही जमिनी भांडवलदारांच्या उद्योगासाठी देऊन, औद्योगिकीकरणाच्या नावाखाली घेऊन त्या ठिकाणी रेसिडेन्सी कॉम्प्लेक्स उभे करायचे, केमिकल झोन लावून शेतकऱ्यांना व ग्रामस्थांना रोजीरोटीपासून उद्ध्वस्त करायचे... असे षड्यंत्र भूमिपुत्रांविरोधात करण्यात आले आहेत.



स्वातंत्र्यानंतर व संयुक्त महाराष्ट्र निर्मितीनंतर राजकीय हस्तक्षेपामुळे भूमिपुत्रांना दुय्यम स्थान प्राप्त झाले. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी १०६ हुतात्मे झाले. त्या काळात तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या पहिल्या भाषणात म्हटले होते की, या संयुक्त महाराष्ट्रात शेतकरी व कष्टकरी जनतेला न्याय मिळेल, त्यांच्या विकासासाठी प्रयत्न केले जातील. या राज्याचा जाणता राजा शरदचंद्रजी पवारसाहेब यांनी प्रथमच महाराष्ट्रात मंडल आयोग लागू केला, पण आज त्यांच्या डोळ्यासमोरच ओबीसींवर आरक्षणाच्या बाबतीत अन्याय होताना दिसतोय ही दुर्दैवाची गोष्ट आहे. पवारसाहेब ठाण्यातील एका कार्यक्रमात म्हणाले होते की, या शहरामध्ये बहुमजली इमारती उभ्या राहत आहेत, एक नवी संस्कृती उभी राहात आहे. दोन हाताचे चार हात होतील, पण त्यांना काम देणारी योजना मात्र या ठिकाणी दिसत नाही, ही खंत त्यांनी बोलून दाखविली होती.

मी माझ्या कार्यक्षेत्रातील कळवे येथील मफतलाल कंपनीतील कामगार व ज्यांच्या जागेवर ही मफतलाल कंपनी उभी राहिलीय त्या शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी लढत आहे. ज्या ठिकाणी मफतलाल कंपनीचा कारखाना होता, सभोवताली कम्पाऊंड वॉल होती त्यामध्ये कारखाना उभा राहावा व उर्वरित जागेत ‘दिबां’च्या नवी मुंबई मॉडेलप्रमाणे शेतकऱ्यांना साडेबारा टक्के भूखंड द्यावा आणि शिल्लक जागेत सरकारने तेथे राहात असलेल्या झोपडपट्टीवासीयांसाठी गृहनिर्माण प्रकल्प आखावा. आमचा त्याला पाठिंबाच राहील.

मी या ठिकाणी राज्य सरकारला स्मरण करून देऊ इच्छितो की, मफतलाल कामगार व शेतकऱ्यांसाठी लढा देत असताना ६ फेब्रुवारी १९८४ साली आमच्यावर प्राणघातक हल्ला झाला होता. यावर ‘लोकसत्ता’सारख्या प्रतिष्ठित दैनिकात संपादकीय लिहिण्यात आले होते, तर जवळपास सर्वच दैनिकांनी आमच्यावरील जीवघेण्या हल्ल्याची दखल घेतली होती. आमच्यावर हल्ला झाल्याची बातमी समजताच स्वातंत्र्यसेनानी, समाजवादी नेते एस. एम. जोशी यांनी याची त्वरित दखल घेतली आणि ग. प्र. प्रधानमास्तर, भाई वैद्य, राजारामबापू पाटील, पी. के. अण्णासाहेब, दत्ताजी ताम्हाणे, मृणालताई गोऱ्हे, प्रमिलाताई दंडवते आदींना दूरध्वनीवर सांगितले की, ‘दशरथ पाटील यांच्या प्रकृतीची जाऊन चौकशी करा, त्यांची काळजी घ्या’. एस. एम. जोशी यांच्या आदेशानुसार सर्व नेत्यांनी तातडीने माझी काळजी घेतली. अनेक मान्यवर नेते माझ्या प्रकृतीच्या चौकशीसाठी इस्पितळात मला भेटण्यासाठी आले होते. हा दिवस माझ्यासाठी अविस्मरणीय प्रसंग म्हणून कायमस्वरूपी मनाच्या गाभाऱ्यात कोरला गेला आहे.

ज्या भूमिपुत्र कामगार-शेतकरी यांच्या जमिनीसाठी लढताना आमचे रक्त सांडलेले आहे त्या जमिनीवर आजही काही राजकीय नेत्यांचा व भांडवलदारांचा डोळा आहे आणि जोपर्यंत आम्ही जिवंत आहोत तोपर्यंत या प्रश्नांची तड लावल्याशिवाय मी व माझा भूमिपुत्र स्वस्थ बसणार नाही. भविष्यात या जमिनीवर भूमिपुत्रांच्या विरोधात चुकीचे काही घडले, तर भूमिपुत्रांचे प्रखर आंदोलन उभे राहील याची सरकारने दखल घ्यावी. शेवटी मी सरकारला विनंती करतो की, भूमिपुत्रांच्या तीव्र भावनांची दखल घेऊन नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचेच नाव द्यावे, तसेच भूमिपुत्रांच्या इतर प्रलंबित प्रश्नांवरही गांभीर्यपूर्वक लक्ष देऊन तोडगा काढावा; अन्यथा चिडलेला, संतापलेला भूमिपुत्र या राज्यात क्रांती घडविल्याशिवाय राहणार नाही आणि असे घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सरकारचीच असेल, असा इशारा आम्ही सरकारला देत आहोत.

आम्ही या ठिकाणी वचन देऊ इच्छितो की, पनवेल, उरण, रायगड, नवी मुंबईतील भूमिपुत्रांना न्याय मिळवून देण्यासाठी लोकनेते दि. बा. पाटील यांनी आपले रक्त सांडले होते. यामुळे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला ‘दिबां’चे नाव मिळेपर्यंत आम्ही गप्प बसणार नाही. आमची ही भूमिका शेवटच्या श्वासापर्यंत कायम राहील, असेही कृती समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

### विमानतळाला ‘दिबां’चे नाव लावण्यासाठी किती रक्त पाहिजे –दशरथ भगत

मुंबईचे प्रश्न सागरपुत्र आणि भूमिपुत्रांचे आहेत. नोकरी, रोजगार असे अनेक प्रश्न मुरूडपासून डहाणूपर्यंत हा शहरीकरण आणि औद्योगिकीकरणामध्ये कशा पद्धतीने वाटोळे होत आहे. प्रकल्प करा, प्रकल्प झाले पाहिजे, प्रगती झाली पाहिजे, विकास झाला पाहिजे, सगळे झाले पाहिजे, पण विकासामध्ये बहुसंख्याकांना सुखसुविधा दिल्याच पाहिजेत. विकासाच्या वाटेवरून जी गाडी जाणार आहे तिथे भूमिपुत्राला दफन केले आहे. आपण विमानतळाच्या क्षेत्रात बसलो आहोत म्हणजेच दिबांच्या भूमीत आहोत. जन्मभूमी दिबासाहेबांची, कर्मभूमी दिबांची, संघर्षभूमी दिबांची, रक्त सांडले दिबांचे आणि भूमिपुत्रांचे. मग नाव कुणाचे द्यायचे? फक्त आणि फक्त दिबांचेच. जनता हेच सरकार आहे आणि दिबांचे नाव हे जनतेचा निर्णय आहे. भूमीवर लोकाधिकार भूमिपुत्राला आहे, असे सांगतानाच नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांचे नाव घेता, मंत्र्यांना काय माहीत, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. ७४ची घटना दुरुस्ती म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार देण्यात आला आहे. सिडकोने ठराव केला, मग हा ठराव कुठे आहे, प्रस्ताव कुठे आहे ते दाखवा नाहीतर साधी म्हण आहे ’बाप दाखवा नाहीतर श्राद्ध करा’. दाखवा ना ठराव दाखवा कुठे ठेवलाय आणि दाखवला तर कायदा सांगा. या जमिनीवर जी गावे आहेत, त्या ग्रामपंचायतींचा, स्थानिक स्वराज्य संस्थेचा ठराव दाखवा. महापालिका, विधानसभा, लोकसभा, राज्यसभा, विधान परिषद या सभा आहेत, असे सांगतानाच सिडको संचालक बोर्ड एवढासाच आहेत. ते संचालक मंडळ सभा आहे का, असा सवालही त्यांनी उपस्थित करत विमानतळाला दिबांचे नाव आणि विविध प्रश्न सुटल्याशिवाय हे आंदोलन संपणार नाही. जास्तच अरेरावी केली, जास्त त्रास दिला आणि जर आत्मसन्मान होत नसेल, तर आत्मदहन करू. सिडको आणि राज्य सरकार तुमची भूक सांगा, तुम्हाला किती रक्त पाहिजे ते सांगा, किती आत्मदहन पाहिजे ते येऊन सांगा. दिबांचे नाव विमानतळाला लागले पाहिजे यासाठी सर्वपक्षीय एकत्र आलो नारा दिला, पण असे काय घडले की दिबांच्या नावाला विरोध करत पळाले. सुरुवातीच्या सभेत ‘हम सब एक है’चा नारा दिला. छाती फुटेपर्यंत घोषणा दिल्या आणि तर असा प्रेशर कुठून आला की दादा, बाबा पळून गेले. एक एक पळाला, त्या वेळी तुम एक हम अलग नंतर आम्ही बाजूला आणि तुम्ही रस्त्यावर, तुम लढो हम कपडा संभाळता है, असे करायला थोडी तरी शरम वाटायला पाहिजे होती. सिडको सोंगटी आहे. तिला चालवणारे बोट चेचायचे असून आंदोलन चिरडणारे समाजद्रोही आहेत.

### सिडको आणि राज्य सरकारला प्रकल्पग्रस्तांचा राग बघायचा आहे का –प्रेम पाटील (२७ गाव समिती)

या मातीत इथल्या जमिनीत साडेबारा टक्के मोबदला देण्यासाठी दि. बा. पाटील साहेबांनी अनेक लढे केले व करावे लागले. पाच हुतात्मे गमवावे लागले. त्याच प्रकारचा आपल्या हक्कासाठी प्रेरणादायी आंदोलन उभे राहिले आहे. येथील मातीचा ढेकूळ पाण्यात टाकला आणि पाण्यात जो तवंग उठेल तो तवंगसुद्धा दिबासाहेबांसाठी असेल. नवी मुंबई विमानतळासाठी आपल्या जमिनी गेल्या. रहाटी घर उद्ध्वस्त केली. हजार वर्षांपूर्वीच अस्तित्व मातीमोल केलं. याचं कारण म्हणजे सिडको आहे. याची मला खंत वाटायची, पण आता खंत वाटायची गरज नाही, कारण नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमातळाला दिबांसाहेबांचे नाव लागतोय आणि पुन्हा आपले अस्तित्व जागे होतेय. सिडकोने प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसनासंदर्भात कुठल्याही मागण्या पूर्ण केल्या नाहीत. प्रत्येक गोष्टीवर सिडकोची चालढकलपणा असते. पाच गावांना ब्लास्टिंगचा हादरा बसतो त्याचबरोबर २७ गावांच्या छोटे छोटे प्रश्न सिडको स्तरावर प्रलंबित आहेत. या चालढकलपणाला वाचा फोडायची असेल, तर येणाऱ्या २४ तारखेला विमानतळाचे काम बंद आंदोलन २७ गाव व सर्वपक्षीय कृती समितीच्या माध्यमातून होणार आहे. विमानतळाला दिबासाहेबांचे नाव लागावे यासाठी मोठ्या संख्येने प्रकल्पग्रस्त रस्त्यावर उतरले आहेत याचा राग शासनाला आला आहे. यातील मोठा सूत्रधार नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे आहे. शासनाला आव्हान असेल, तुम्हाला राग काढायचा असेल तर काढा, पण आमचा राग बघायचा असेल, तर तुम्हाला बघायला भेटेल. ज्या ज्या आंदोलनाला महिला शक्ती उतरली आहे. ते प्रत्येक आंदोलन यशस्वी झाल्याशिवाय राहिले नाही. या आंदोलनातही महिलाशक्ती मोठ्या संख्येने उतरली आहे.

### हा भूमिपुत्राचा एल्गार –गुलाबराव वझे

२४ जूनच्या आंदोलना वेळी पाच हजार पोलिसांचा बंदोबस्त लावला. यावरून शासन समजून गेला आहे की भूमिपुत्र शांत होणार नाही. कोकणातील आगरी आणि नागपुरातील कोष्टी असे आहेत की पुकारलेले आंदोलन पूर्ण केल्याशिवाय माघार घेत नाहीत. अशा प्रकारची भूमिका इंग्रजांनी देश सोडताना लिहून ठेवली आहे. जोपर्यंत दिबांचे नाव विमानतळाला लागत नाही तोपर्यंत पाचही जिल्ह्यातील समस्त भूमिपुत्र गप्प बसू शकत नाही. कोविड आहे नाही तर या ठिकाणी २० हजारांहून अधिक भूमिपुत्र येणार होते. आंदोलन लगेच संपणार नाही ‘दिबां’चे नाव लागेपर्यंत हे आंदोलन चालणार आहे. ‘दिबां’नी राज्यभरातील भूमिपुत्रांचे नेतृत्व केले. हा भूमिपुत्राचा एल्गार आहे.

### ‘दिबां’च्या नावाचा सर्वप्रथम प्रस्ताव –संतोष केणे

ही भूमी आमचा आत्मा, अस्तित्व आणि रक्तरंजित क्रांती आहे. आमच्या जमिनीचा आमच्या नेत्याचा नावाच्या नामकरणाचा हक्क आहे. आणि तो मिळालाच पाहिजे. त्यासाठी सर्व एकत्र झालो आहोत. शासनाची भूमिका सिडकोच्या ठरावावर आहे, पण सांगू इच्छितो २०१८ला ‘दिबा’ साहेबांच्या नावाचा प्रस्ताव गेला आहे आणि ते पत्र माझे होते आणि अध्यक्ष अशोक चव्हाण होते, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. त्यामुळे दिबांच्या नावाचा सर्वप्रथम प्रस्ताव गेला आहे. त्यामुळे राज्य सरकारने खोटा आणि रडीचा डाव खेळू नये, न्याय द्यायचा असेल तर सरळ द्या कारण हा समाज पेटला, तर आगीशी तुमचा सामना होईल. त्यामुळे या आगीशी खेळू नका. ठाणे जिल्ह्यात सागरी कोळी समाजातील लोकांच्या पाठबळावर उड्या मारतात. समाजाचे पाठबळ निघाले तर हा नेता राहणार नाही. हे आंदोलन आणि व्यासपीठ भाजपचे आहे, असे सांगत दुफळी निर्माण करण्याचा डाव आखला जातो. ही सर्वपक्षीय समिती आहे, यामध्ये भाजप आहे, मी काँग्रेसचा आहे, राष्ट्रवादीचे आहे, शिवसेनेचे उपनेते दशरथदादा पाटील अध्यक्ष आहेत. सर्व संघटना आहेत सर्वांना सलाम करतो. संघटनेला डाग लावणाऱ्यांना भीक घालू नका.

### उद्धवसाहेबांनी पिताप्रेम थांबवले नाही, तर... –रूपेश धुमाळ (२७ गाव समिती)


दि. बा. पाटील साहेबानी स्वतःच्या संसाराची राखरांगोळी केली, पण समाजात करोडपती घडवले. त्यांचा विसर समाजाला पडत चालला होता, परंतु दिबांचे नाव विमानतळाला लागले पाहिजे हा जेव्हा निर्धार घेऊन २४ जूनला भूमिपुत्र रस्त्यावर उतरले, घेराव आंदोलन केला, तेव्हा सिडकोची पळता भुई थोडी झाली. ‘दिबा’ साहेबांनी मूलमंत्र दिला आहे. हुतात्म्यांचे रक्त वाया जात नसते वाया जाऊ द्यायचे नसते. त्यामुळे लाखोंच्या संख्येने भूमिपुत्र रस्त्यावर उतरले होते. मागच्या महिन्यात तीन महिन्यांचे बाळ घेऊन सिडकोच्या तोड कारवाईला विरोध करणाऱ्या महिलेवर ३५३ चा गुन्हा सिडकोने दाखल केला. त्याचबरोबर स्वतःचे घर वाचवता येत नाही म्हणून सिडको न्याय देत नाही म्हणून एका तरुणाने रॉकेल अंगावर ओतून घेतले. सिडको पोलीस बळाचा वापर करून घेत आहे. त्याला १५ दिवस जेल झाली. मला परवा एका पोलीस कॉन्स्टेबलचा फोन आला. तुमच्या ग्रीलच्या कामामुळे परप्रांतीयांना त्रास होत आहे ते थांबवा. काय गंमत आहे बाहेरून राहायला आलेल्याला संरक्षण आणि येथील भूमिपुत्रावर दबाव. विमानतळाच्या ब्लास्टिंचे आवाज आणि तडे जातात याचा आवाज पोलीस आणि सिडकोला का जात नाही. तेव्हा ते काम बंद करायला पोलीस तुम्ही का येत नाही. हा माझा पोलीस प्रशासनाला सवाल आहे. प्रत्येक वेळी सांगतात आंदोलन करू नका. आम्ही अन्याय सहन करत मरत राहायचे. सरकारला सांगायचे आहे तुम्हाला किती हुतात्मे पाहिजेत. पाच तर दिले आहेत. पाचशे द्यायची पण तयारी भूमिपुत्रांमध्ये आहे, पण अन्याय सहन होणार नाही आणि याच्यापुढे सहन केला जाणार नाही. या विमानतळाच्या भरावामुळे पाच गावांमध्ये पाणी भरते तिथे कुठलीही सरकारी यंत्रणा मदतीला येत नाही. एकदा कलेक्टर माय बाप आलेली आणि फक्त हळदीकुंकू करून गेली. तिला इथल्या भूमिपुत्रांचे प्रश्न दिसले नाहीत. अजित पवारांची एक स्टेटमेंट आहे. शेतकऱ्यांना पाणी येत नाही तर मी धरणात मुतू का? मग हे सिडकोत टॉयलेट करायला येतात का, त्यांना येथील लोकांचे प्रश्न दिसत नाहीत का? वाघिवली गाव पुनर्वसित होत नाही म्हणून त्यांचे पाणी बंद करतात. पिण्याचे पाणी बंद करणे मोठा अन्याय आहे. त्यामुळे सिडकोवर कोणता गुन्हा दाखल केला पाहिजे हा प्रश्न आहे माझा सिडकोला. आपल्या सर्वांची कुलस्वामिनी आई एकविरा आहे तशी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची कुळस्वामीनी आई एकविरा आहे. आई एकविरा मुख्यमंत्र्यांना सद्बुद्धी दे आणि विमानतळाला दिबासाहेबांचे नाव देऊ दे. त्यांना जे पिताप्रेम उफाळून आलेले आहे. ते पिताप्रेम कुठेतरी थांबले पाहिजे. मी मागच्या स्टेटमेंटमध्ये सांगितले होते बाळासाहेबांना पुत्रप्रेम आवरता आले नाही म्हणून मनसे पक्षाची स्थापना झाली आणि आता जर उद्धवसाहेबांनी पिताप्रेम थांबवले नाही, तर उद्यापर्यंत पनवेलमध्ये एकसुद्धा नगरसेवक निवडून आला नाही आणि यांचा आमदार कसा होतो हे येथील भूमिपुत्र बघून घेईल.

### ‘दिबा’साहेबांच्या नावाचा प्रस्ताव उद्धव ठाकरेंना सहन झाला नाही –माजी खासदार जगन्नाथ पाटील

विमानतळाच्या विषयामध्ये मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याशी बैठक झाली. त्या वेळी त्यांनी त्यांचा हट्ट सोडला नाही. मी महाराष्ट्रातील मुख्यमंत्री जवळून पाहिलेत, पण लोकांचे म्हणणे न ऐकता बैठकीतून निघून जाणारे उद्धव ठाकरे पहिले मुख्यमंत्री आहेत हे सर्वांचे दुर्दैव आहे. दशरथ पाटील यांनी जेव्हा दिबासाहेबांच्या नावाचा प्रस्ताव सांगितला तो त्यांना सहन झाला नाही. घी देखा मगर बडगा नही देखा अशी कल्याण लोकसभेत परिस्थिती सुरू आहे. कल्याण लोकसभेत पालकमंत्री एकनाथ शिंदे, मुलगा खासदार यांच्याकडून शासनाचा शेकडो कोटींचा निधी कल्याण लोकसभेत वळविण्याचे काम सुरू आहे. जसा उद्धव ठाकरेंना आदित्य ठाकरेंना मंत्री करण्याचा मोह झाला. हे पहिले मुख्यमंत्री आहेत यापूर्वी असा मोह कुणीही केला नाही. तसाच मोह एकनाथ शिंदे कल्याणमध्ये करीत आहेत.

### नाम नही तो काम नही –कॉम्रेड भूषण पाटील

गेल्या दोन वर्षात एकच नारा होता आमच्या मनाने घेतलाय ठाव विमानतळाला दि. बा. पाटील साहेबांचाच नाव. ९६व्या जयंतीनिमित्त प्रतिज्ञा करतो जो विमान उडेल तो दिबा साहेबांच्याच नावाने उडेल. ही भूमी आमच्या आई-वडिलांची, आजोबांची आहे. आपण लढतोय १० जून, २४ जूनला, मुख्यमंत्र्यांसोबत बैठक झाली. आपल्या लढ्यामुळे तो ठराव स्थगित झाला आहे. तो ठराव खंडित करा आणि दि. बा. पाटील साहेबांच्या नावाचा ठराव करा. दि. बा. पाटील साहेबांनी लढायला शिकवले आहे. ते म्हणायचे मी दिवसाला २० गोळ्या घेतो ते जगण्यासाठी नाही लढण्यासाठी घेतो. नाम नही तो काम नही. बेमुदत काम बंद करायचे आहे आणि ही भूमिपुत्रांची भावना आहे. नाव हे आमचे अस्तित्व आहे. जोपर्यंत नाव नाही तो पर्यंत लढा कायम ठेवूया.



# एलआयसीचा आयपीओ अनेक विक्रम करण्यास सज्ज

**येत्या एक फेब्रुवारीला सादर होणारा देशाचा अर्थसंकल्प आणि त्या पाठोपाठ देशातील सर्वात मोठा ठरू शकेल असा एलआयसीचा येणारा आयपीओ, या मोठ्या आर्थिक घटना आहेत. एलआयसीच्या आयपीओने सरकारी तिजोरीत चांगली भर तर पडेलच, पण गुंतवणूकदारांना देशातील सर्वात मोठी कंपनी होण्याची क्षमता असलेल्या कंपनीत गुंतवणुकीची एक संधी मिळेल.**

**अर्थ प्रहर**



**यमाजी मालकर**
(ymalkar@gmail.com)

भारतातील आतापर्यंतचा सर्वात मोठा आयपीओ म्हणून ज्याच्याकडे पाहिले जाते आहे, त्याच्या तारखा आणि इतर सर्व माहिती नेमकेपणाने पुढील आठ दिवसांत आपल्यासमोर असेल. हा आयपीओ म्हणजे एलआयसीचे खाजगीकरण आहे, ते व्हावे की न व्हावे, तो या वर्षी येणार की पुढील वर्षी, त्यातून सरकारच्या तिजोरीला खरोखरच किती हातभार लागणार, एलआयसीच्या पॉलिसीधारकांना त्याचा किती लाभ मिळणार, शेअर बाजारात नोंद झाल्यावर त्यातून गुंतवणूकदारांना किती फायदा मिळणार, त्यानंतर एलआयसीच्या कामकाजात काय बदल होणार, असे अनेक प्रश्न निर्माण झाले असून त्याची उत्तरे मिळण्याची वेळ जवळ आली आहे. सरकारच्या आताच्या इराद्यानुसार सर्व घडले तर आगामी अर्थसंकल्प आणि एलआयसीचा आयपीओ, अशा दोन मोठ्या घटना फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात एकाच वेळी पाहायला मिळतील. देशाच्या आर्थिक क्षेत्रातील आणि भांडवली बाजारातील ही एक मोठी घटना असेल.

**सर्वांत मोठी गुंतवणूक संस्था**

शेअर बाजारात गुंतवणूक करून पॉलिसीधारकांना फायदा मिळवून देणाऱ्या एलआयसीचे पाच ते १० टक्केही खाजगीकरण करू नये, असे म्हणणे हा दुटप्पीपणा आहे. सध्या शेअर बाजारातील कंपन्यांमधील तब्बल चार टक्के हिस्सा एलआयसीकडे आहे. या नात्याने ती भारतातील सर्वात मोठी गुंतवणूक संस्था आहे. अनेक सरकारी योजना राबविण्यासाठी सरकार एलआयसीचा वापर करते, पण जेव्हा ती कंपनी शेअर बाजाराचा भाग होईल, तेव्हा सरकारला त्या विषयीच्या धोरणाला काही मर्यादा येतील. शिवाय, एलआयसीला आपली कार्यक्षमता सिद्ध करावी लागेल. जीवन विमा उद्योगात खाजगी कंपन्यांना प्रवेश दिला गेला, तेव्हापासून म्हणजे गेली २१ वर्षे एलआयसी खाजगी विमा कंपन्यांशी स्पर्धा करते आहे. त्यापूर्वी एलआयसीला स्पर्धा नव्हती. त्याचा अर्थातच एलआयसीला फायदा होत गेला. गेली दोन दशके जेव्हा तिच्या स्पर्धेत खाजगी कंपन्या आल्या, तेव्हा एलआयसीची कार्यक्षमता वाढली. त्यामुळेच तब्बल ६६ टक्के जीवन विम्याचा हिस्सा अजून तिच्याकडे आहे. एवढा मोठा कारभार असलेली कंपनी भांडवल बाजारात येणार, याचे म्हणूनच औत्सुक्य निर्माण झाले आहे.

**देशातील सर्वांत मोठा आयपीओ**

भांडवली बाजारात पेटीएमचा आयपीओ १६ हजार कोटी रुपयांचा होता, त्या खालोखाल कोल इंडिया (१५ हजार ५०० कोटी), रिलायन्स पॉवर (११ हजार ७०० कोटी), न्यू इंडिया अॅशुरन्स (९ हजार ६०० कोटी) यांचा क्रमांक लागतो. या पार्श्वभूमीवर एलआयसीचा आयपीओ




५० हजार कोटींचा असेल, म्हणजे तो किती मोठा आहे, याची कल्पना येते. गेल्या १२ महिन्यांत विक्रमी संख्येने आयपीओ बाजारात आले आणि विक्रमी पैसा उभा राहिला. आता जेव्हा एलआयसीचा आयपीओ येईल तेव्हा गुंतवणूकदारांच्या हातात तेवढा पैसा असेल का, अशी चर्चा केली जाते आहे. या आयपीओला उशीर होण्याचे कारण या कंपनीचे मूल्यमापन करताना आलेल्या अडचणी सांगितल्या जातात. एलआयसीकडे असलेली जीवन विमा क्षेत्रातील उत्पादने, देशाच्या कानाकोपऱ्यात असलेल्या जागा आणि इमारती, तिच्या उपकंपन्या, या सर्व मालमत्तेचे मूल्य ठरविणे अवघड आहे. अखेर ते पूर्ण झाले. ते १० लाख कोटी रुपये निश्चित करण्यात आले असा अंदाज आहे. गेल्या आर्थिक वर्षात दोन हजार ९०१ कोटी रुपये नफा मिळविणारी ही कंपनी आयपीओद्वारे सरकारला ५० हजार कोटी रुपये मिळवून देईल, असा अंदाज आहे.

**पॉलिसीधारकांसाठी विशेष कोटा**

आयपीओला चांगला प्रतिसाद मिळावा, यासाठी सरकार अनेक पातळ्यांवर प्रयत्न करते आहे. ३० कोटी पॉलिसीधारकांना या आयपीओत सामील होता यावे, यासाठी त्यांना विशेष कोटा तयार करण्यात आला असून गेले महिनाभर त्याच्या तांत्रिक बाबींची पूर्तता केली जात आहे. पॉलिसीधारकांनी एलआयसीकडे पॅन कार्डची नोंद करावी आणि डिमॅट खातेही काढून घ्यावे, यासाठी केल्या जात असलेल्या जाहिराती हा त्याचाच एक भाग आहे. परदेशी आर्थिक संस्थांनी या आयपीओत उतरावे, यासाठीही प्रयत्न केले जात आहेत. आयपीओची तयारी म्हणून कंपनीतर्फे काही आकडेवारी गेल्या काही दिवसांत प्रसिद्ध करण्यात आली, हाही त्या प्रयत्नांचाच भाग म्हणता येईल. उदा. ऑनलाईन सेवा पुरविण्यात एलआयसी मागे होती, पण आता म्हणजे २०२०-२०२१मध्ये ७२.३५ टक्के व्यवहार आणि ६४.१९ टक्के हप्ते डिजिटल पद्धतीने करण्यात आले, असे सांगितले गेले. एलआयसीच्या वेबसाईटमध्ये गेले काही दिवस सुधारणा करण्यात येत आहेत. तब्बल २४ कंपन्यांच्या स्पर्धेत एलआयसीने गेल्या आर्थिक वर्षांत चांगला व्यवसाय केला असून अशा पार्श्वभूमीवर या आयपीओला चांगला प्रतिसाद मिळेल, असे सरकारला वाटणे साहजिक आहे. गुंतवणूकदार आणि पॉलिसीधारकांनी या आयपीओचा अवश्य लाभ घेतला पाहिजे.

### एलआयसीच्या आयपीओच्या निमित्ताने...

एआयए ही हाँगकाँगची विमा कंपनी सर्वाधिक बाजारमूल्य असलेली विमा कंपनी आहे. तिचे मूल्य १३९.२३ अब्ज डॉलर आहे. एलआयसीचे मूल्य आज १३३ अब्ज डॉलर गृहित धरले तर ती जगातील तिसऱ्या क्रमांकाची विमा कंपनी ठरेल.

एलआयसी सध्या ३६.७ लाख कोटी रुपयांच्या मालमत्तेचे व्यवस्थापन करते. जे भारताच्या जीडीपीच्या १८ टक्के आहे.

एलआयसीची मालमत्ता ४६३ अब्ज डॉलर इतकी असून ती जगातील अनेक देशांच्या जीडीपीपेक्षा अधिक आहे.


एलआयसीच्या ११ हजारांपेक्षा अधिक शाखांमध्ये तीन लाखांपेक्षाही अधिक कर्मचारी काम करत असून एजंटांची संख्या २४ लाख इतकी आहे.

एलआयसीच्या आयपीओमुळे ही भारतातील दुसऱ्या किंवा तिसऱ्या क्रमांकाचे बाजारमूल्य असलेली कंपनी ठरेल. सध्या रिलायन्स इंडस्ट्रीज (१७.१७ लाख कोटी रुपये) ही पहिल्या तर टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस (१४.६७ लाख कोटी रुपये) ही दुसऱ्या क्रमांकाचे बाजारमूल्य असलेल्या कंपन्या आहेत.

---

# २०२२मध्येही कमाईची संधी देण्याची भारतीय बाजारात क्षमता!

**भारतीय बाजार एकतर्फी वर जाताना दिसत असला तरी तो या वर्षभरात याच वेगाने वर जाण्याची शक्यता नाही. अर्थात, काही घटना अशा घडत आहेत की तो आता फार खाली येण्याचीही शक्यता नाही. त्यामुळे गुंतवणूकदारांना २०२१ सारख्या संधी २०२२ मध्येही मिळण्याची शक्यता आहे.**



**प्रसाद ल. भावे**
sharpadvisers@gmail.com



नुकतेच माझ्या मोबाईलसाठी मी एक कव्हर डिझाईन करून बनवून घेतलं ज्यावर जीजीभॉय टॉवरचं चित्र असून त्यावर ठळक अक्षरांत SENSEX १,००,००० असं लिहिलंय. नक्कीच कुतूहलानं अनेकांनी त्याबाबत 'कधी' या अगदी अपेक्षित प्रतिक्रियायुक्त प्रश्नांची विचारणा केली. अगदी काळ्या दगडावरील ही पांढरी रेघ म्हणावी तसा हा प्रकार आहे तसंच, सेन्सेक्स १ लाख कधी? याचं उत्तर कोणीही ठामपणे सांगू शकत नाही हे देखील अधोरेखित सत्य आहे. गरज आहे बाजाराबाबत विश्वास, संयम, समंजसपणा बाळगण्याची.

कोविड-१९ साथीच्या रोगाने जगभरातील अर्थव्यवस्था विस्कळीत करायला सुरुवात केली याला आता जवळपास दोन वर्षे झाली आहेत. मार्च २०२०मध्ये अभूतपूर्व लॉकडाऊनमुळे आर्थिक गोष्टींना हातभार लावण्यासाठी जगभरातील सरकारं व मध्यवर्ती बँकांनी मोठ्या प्रमाणात आर्थिक उत्तेजनांद्वारे सकारात्मक व पूरक प्रतिसाद दिला.

२०२१ मधील लक्षणीय दुसऱ्या लाटेनंतर ज्यामध्ये आर्थिक परिणामापेक्षा मानवी प्रभाव अधिक गंभीर होता, हळूहळू अर्थव्यवस्थेत सुधारणा होत गेल्या आणि कंपन्यांच्या कमाईमध्ये पुनर्प्राप्ती पाहण्यास मिळाली. यामुळे जागतिक तरलता वाढीमुळे भारतासह अनेक जागतिक बाजारांना विक्रमी उच्चांक गाठण्यात मदत केली. तथापि, वस्तूंच्या किमतीतील वाढ आणि पुरवठा साखळीतील व्यत्यय यामुळे चलनवाढीचा दर अमेरिकेत जवळपास मागील ४० वर्षांच्या उच्चांकावर पोहोचला. तर इतर देशांमध्येही चलनवाढीचा दर वाढू लागला, ज्यामुळे जगभरातील मध्यवर्ती बँकांनी त्यांचे आर्थिक प्रोत्साहन सामान्य करण्यावर भर दिला. २०२१ हे जागतिक स्तरावर, तसेच भारतातही कोविड लसीकरण मोहिमेद्वारे चिन्हांकित केले गेले ज्यामुळं स्थिर भाव वाढण्यास मदत झाली. कॉर्पोरेट अर्निंग्स सकारात्मक राहतील या आशेनं त्यात भरीव योगदान दिलं.

**कमाईतील वाढ व मूल्यांकन**

आर्थिक वर्ष २१ मध्ये, आम्ही भारताच्या जीडीपीमध्ये ७.३ टक्क्यांची विक्रमी वाढ पाहिली, परंतु कमाईच्या वाढीमध्ये सुमारे १० टक्के संकुचित होण्याच्या पूर्वीच्या अपेक्षेच्या विरुद्ध जाऊन निफ्टीच्या इपीएसमध्ये सुमारे १८ टक्क्यांची वाढ दिसली. भारतात दुसऱ्या तीव्र लाटेचा अनुभव घेऊन आणि आता तिसऱ्या लाटेची भीती असताना कंपन्यांच्या कमाईमध्ये कोणतीही लक्षणीय घट झालेली दिसत नाहीये आणि यापुढं ती वाढण्याचीच अपेक्षा बाजार बाळगून आहे. त्यात, कॉर्पोरेट्सच्या खर्च कपातीच्या उपक्रमांमुळं त्यांच्या नफ्यात वाढ दिसत असल्यानं जागतिक तरलता वाढीबरोबरच बाजारातील सकारात्मक भावना आणि तेजीला हातभार लागला आहे. तथापि, बाजारातील उच्चांकासह बाजार मूल्यमापन देखील विस्तारलं आहे आणि सध्या ते दीर्घकालीन सरासरीच्या वर आहेत.

**मजबूत आर्थिक पुनर्प्राप्ती**

एकूण मागणी परिस्थिती सुधारत असल्याचे दिसते जे विविध आर्थिक निर्देशकांद्वारे स्पष्ट आहे. नोमुरा इंडिया बिझनेस रिझम्प्शन इंडेक्स आता महामारीपूर्वीच्या पातळीपासून जवळपास १८ अंकांनी जास्त आहे. भारताचा जीडीपी आर्थिक वर्ष २१ मध्ये विक्रमी ७.३ ने घसरला (स्वातंत्र्यानंतरचं सर्वात मोठं आकुंचन) परंतु आर्थिक वर्ष २२ मध्ये जीडीपी साडेनऊ टक्क्यांनी वाढण्याची अपेक्षा आहे. अर्थव्यवस्थेच्या अनेक क्षेत्रांमध्ये, आऊटपूटची महामारीपूर्व पातळी आता ओलांडली गेली आहे आणि नॉमिनल जीडीपीदेखील आता महामारीपूर्व पातळीच्या वर आहे.

**आर्थिक उत्तेजनाचे सामान्यीकरण**

यूएस फेडरल रिझर्व्हने त्यांचा रोखे खरेदी कार्यक्रम हळूहळू कमी करण्याचा निर्णय घेतला. फेडनं देखील २०२२ मध्ये आधीच्या एखाददुसऱ्या दरवाढीच्या तुलनेत तीन दरवाढ दर्शवल्या आहेत आणि महागाईवर चर्चा करताना ट्रान्झिटरी हा शब्द वापरून सोडला होता, ज्याचा अर्थ निघतो क्षणभंगूर. डिसेंबरच्या बैठकीत, फेडनं २०२१ साठीचा डीजीपी अंदाज पूर्वीच्या ५.९ टक्केवरून ५.५ टक्केपर्यंत कमी केला. आपल्या बॉण्ड टॅपरिंग नंतर अमेरिका व्याजदर वाढीचे संकेत देत आहे. याचे फारसे पडसाद आपल्या बाजारात उमटले नाहीत कारण भारतात, आरबीआयने अनुकूल राहात प्रणालीमध्ये तरलता आणण्यास प्राधान्य दिलेलं दिसतंय. भारतातील महागाई तुलनेनं अधिक चांगल्या स्थितीत असल्यानं चलनविषयक धोरणाच्या आघाडीवर थोडीशी सहजता उपलब्ध करून घेता येत आहे.

ऑटो क्षेत्रात इलेक्ट्रिक वाहनांवर (EV) सरकार देखील विशेष भर देताना आणि त्यासाठी पूरक योजना राबवताना दिसत आहे. आगामी अर्थसंकल्पात, विशेषतः ईव्ही चार्जिंग पायाभूत सुविधा विभागामध्ये अतिरिक्त चालना मिळण्याची शक्यता आहे. त्याजबरोबर पायाभूत सुविधा क्षेत्रं, परवडणारे गृहनिर्माण प्रकल्प आणि आरोग्य पायाभूत सुविधांसाठी सतत वाढत्या अपेक्षा ठेवल्या जात असून त्यात काही वावगं नाही.

**बाजाराच्या उच्चांकाला कमाईचा आधार**

पीएलआय (प्रॉडक्शन लिंक्ड इन्सेंटिव्ह) योजनेद्वारे देशांतर्गत उत्पादनाला चालना देण्याच्या सरकारच्या उपक्रमाचा चांगला फायदा दिसून येत आहे. मोठ्या संख्येने कंपन्या त्यांचा उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी याचा वापर करू पाहत आहेत. या योजनेला आगामी अर्थसंकल्पात आणखी तरतूद मिळू शकते. नवीन ओमिक्रॉन कोविड प्रकाराने संभाव्य तिसऱ्या लहरीबाबत काही अनिश्चितता वाढवली आहे, मात्र ती लवकर ओसरेल, असा आशावाद व्यक्त केला जातो आहे. भारत आणि जागतिक स्तरावर वाढलेले लसीकरण कव्हरेज ही लाट मर्यादित ठेवण्यास मदत करू शकते. आम्ही दुसऱ्या कोविड लाटेवरून (प्रामुख्याने डेल्टा व्हेरिएंटचे) पाहिले आहे की लॉकडाऊन अधिक सुकर केलं गेलं आहे आणि त्यानुसार व्यवसायांनी देखील त्यास अनुसरून रूपांतर केलं आहे- परिणामी २०२० मध्ये पहिल्या लॉकडाऊनच्या तुलनेत कमी आर्थिक हानी झाली, तसेच कंपन्यांच्या कमाईवर सकारात्मक परिणाम झाला आहे. जर कंपन्यांच्या कमाईच्या वाढीचा वेग अपेक्षेप्रमाणे वाढला, तर ते काही प्रमाणात वर्तमान उन्नत बाजार मूल्यांचं समर्थन करण्यास मदत करू शकतं.

२०२२ हे वर्ष प्रमुख मध्यवर्ती बँकांद्वारे जागतिक चलनविषयक धोरणांचे आणखी एक सामान्यीकरण असू शकेल. रशिया, ब्राझील, तुर्कस्थान, दक्षिण आफ्रिका, दक्षिण कोरिया इत्यादी देशांच्या अनेक मध्यवर्ती बँकांनी आणि अलीकडेच बँक ऑफ इंग्लंडने २०२१ मध्ये व्याजदर वाढवण्यास सुरुवात केली आहे. जर पतधोरणाचं सामान्यीकरण अपेक्षेपेक्षा लवकर झालं, तर बाजारांमधील अस्थिरता वाढू शकते आणि उदयोन्मुख भारतासह बाजारपेठेतून रोकड बाहेर जाऊ शकते. तरीही, दीर्घकालीन भारतातील विकासाच्या सर्व शक्यता अबाधित आहेत आणि मजबूत मूलभूत तत्त्वांच्या आधारे समवयस्क उदयोन्मुख बाजारपेठांमध्ये भारत हा एक पसंतीचा गुंतवणूक पर्याय राहिला आहे. सध्या मूल्यांकनाच्या दृष्टिकोनातून लार्ज-कॅप कंपन्या अजूनही तितक्याशा वाढलेल्या वाटत नाही आणि करेक्शनमध्ये नक्कीच अशा कंपन्या आकर्षक ठरतील. तथापि, २०२२ मध्ये इक्विटींकडून परताव्याची अपेक्षा ही येणारे वार्षिक कॉर्पोरेट रिझल्ट्स व आधीच उत्तम निकालांच्या निकषांवर लागू झालेली मूल्यवाढ यांमध्ये योग्य समन्वय राखून कंपनीनिहाय संधी हेरण्यास येणारं वर्ष निश्चित उत्तम आहे.

---

## अर्थसाक्षर स्पर्धा : ३
### निकाल पुढीलप्रमाणे

**प्रश्न क्र. १. पुढीलपैकी कोणत्या सरकारी तेल कंपनीचे बाजारमूल्य सर्वांत अधिक आहे?**
**उत्तर : क.)** ओएनजीसी

**प्रश्न क्र. २. शेअर बाजारात गुंतवणूक करण्यासाठी आवश्यक असलेल्या डीमॅट खात्यांची संख्या भारतात सध्या एवढी झाली आहे.**
**उत्तर : ड.)** ७.४ कोटी

**प्रश्न क्र. ३. अप्रत्यक्ष कर असलेल्या गुड अॅण्ड सर्विस टॅक्स (जीएसटी) ची आतापर्यंतची सर्वाधिक मासिक वसुली एवढी झाली आहे.**
**उत्तर : क.)** १.३९ लाख कोटी रुपये

**अर्थसाक्षर स्पर्धा ३ची बरोबर उत्तरे :**
आलेल्या सर्व उत्तरांपैकी केवळ एकाच स्पर्धकाचे उत्तर बरोबर आले असून त्या विजेत्या स्पर्धकाचे नाव **'शेखर शांताराम जगताप'** असे आहे. या स्पर्धकाला 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येत आहे. त्यांनी सदर व्हाऊचर्स दुपारी २ ते ६ या वेळेत दैनिक राम प्रहरच्या कार्यालयातून घेऊन जावे. त्यांचे अभिनंदन!

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ४

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

**१. मोबाईल सेवा पुरविणारी भारतातील सर्वात मोठी कंपनी कोणती आहे?**
**अ.)** जिओ **ब.)** भारती एअरटेल **क.)** व्होडाफोन आयडिया **ड.)** टाटा टेलिकम्युनिकेशन

**२. पुढीलपैकी कोणती संस्था शेअर बाजाराशी संबंधित नाही?**
**अ.)** सेबी (सेक्युरिटीज अॅड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया)
**ब.)** सीडीएसएल (सेन्ट्रल डीपॉजिटरी सर्व्हिसेस इंडिया लिमिटेड)
**क.)** आयइएक्स (इंडिया एनर्जी एक्सचेंज)
**ड.)** बीएसई (बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज)

**३. भारतीय शेअर बाजारात या क्षेत्रातील कंपन्यांचे मूल्य सध्या (डिसेंबर २०२१) सर्वाधिक आहे.**
**अ.)** बँक **ब.)** आयटी **क.)** एफएमसीजी **ड.)** एनर्जी

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा.**

# विहूरमधील विधवा महिलेचे जिल्हाधिकाऱ्यांना साकडे

## न्याय न मिळाल्यास उपोषणाचा इशारा

**मुरूड : प्रतिनिधी**

दोन घरांमध्ये अंतर न सोडता शेजाऱ्यांनी वहिवाटीच्या जागेवर बांधकाम सुरू केले आहे. हे अनधिकृत बांधकाम थांबवून आपल्याला न्याय द्यावा, असे साकडे मुरूड तालुक्यातील विहुर येथील रंजना केशव तांबे या विधवा महिलेने रायगडच्या जिल्हाधिकारी यांना घातले आहे.

विहुर येथील रंजना तांबे यांनी त्यांच्या घराशेजारी मोनिश महेद्र तांबे व महेंद्र हरी तांबे यांनी वाढीव बांधकाम सुरू केल्याचा आरोप केला आहे. हे दोघे अनधिकृतपणे वहिवाटीच्या जागेवर दोन घरांमध्ये अंतर न सोडता आपल्या घराला खेटून बांधकाम करीत असून, त्याबद्दल तक्रार केली असता ते दमदाटी करून मारहाणीसाठी अंगावर धाऊन येत असल्याने आपल्या जीविताला धोका निर्माण झाल्याचे रंजना तांबे जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

या प्रकरणी गटविकास अधिकारी व विहूर ग्रामसेवकांकडे वेळोवेळी तक्रारी करूनही प्रशासन शेजाऱ्यांनी बांधकाम सुरू ठेवले असून त्यामुळे आपल्यावर अन्याय

(छाया : संजय करडे)



होत आहे. याबाबत गेल्या १८ ऑक्टोबर २०२१पासून आपण आमरण उपोषण करणार होते. त्या वेळी प्रदीप ओव्हाळ यांनी मध्यस्थी केली आणि मोनिश तांबे व महेंद्र तांबे यांनी अटी, शर्ती मान्य केल्या, मात्र नोटरीसमोर करारपत्रावर सह्या करण्यास नकार दिला आणि पुन्हा बांधकाम सुरु ठेवले असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

मोनिश तांबे व महेंद्र तांबे यांचे वाढीव बांधकाम थांबवून जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्याला न्याय द्यावा; अन्यथा येत्या १८ जानेवारीपासून तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा रंजना तांबे यांनी निवेदनाच्या शेवटी दिला आहे.

**रंजना तांबे यांचा अर्ज प्राप्त झाला आहे. त्या अनुषंगाने गटविकास अधिकारी, ग्रामसेवक व बांधकामाशी संबंधित असणाऱ्या लोकांना बोलावून यावर तोडगा काढून हा वाद समन्वयाने मिटवणार आहोत. या महिलेस न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत.**

**–गोविंद कौटुंबे, नायब तहसीलदार, मुरूड**

## दहिवड गावात विनापरवाना बैलगाडी शर्यत

**महाड : प्रतिनिधी**

कोरोना काळात जमावबंदी असतानाही तसेच परवानगी न घेता दहिवड गावात बैलगाडी शर्यत घेतल्या प्रकरणी एका तरुणावर महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात आयोजकावर गुन्हा दाखल**

बैलगाडी शर्यत आयोजनाबाबत सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या नियम व अटींचे पालन न करता तसेच कोरोना विषयक नियमांचे उल्लंघन करत सुशांत रूपक जाधव (रा. आसनपोई) याने २७ डिसेंबर २०२१ रोजी महाड तालुक्यातील दहिवड गावातील मोकळ्या मैदानावर बैलगाडी शर्यत आयोजित केली होती. त्यासाठी आवश्यक असणारी जिल्हाधिकाऱ्यांची लेखी परवानगी तसेच शर्यतीपूर्वी जनावरांची तपासणी केल्याचे पशुसंवर्धन विभागाचे प्रमाणपत्र व शर्यतीच्या ठिकाणी जनावरांच्या प्रथमोपचारासाठी आवश्यक असणारी तयारी केली नव्हती. तसेच शर्यतीच्या ठिकाणी कोरोणाविषयक नियमांचे पालन न करता गर्दीदेखील जमवण्यात आली होती.

याबाबत तहसीलदारांच्या आदेशानुसार तलाठी सुग्राम सोनवणे यांनी पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल केल्यानंतर शुक्रवारी (दि. १४) सुशांत जाधव याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास हवालदार व्ही. पी. पवार करत आहेत.

## रेवस-रेड्डी रस्त्यासाठी पायलिंग टेस्टिंगच्या कामास सुरुवात

**मुरूड : प्रतिनिधी**

रेवस-रेड्डी या कोस्टल मार्गासाठी पायलिंग टेस्टिंगच्या कामास सुरुवात झाली आहे. सदरच्या रस्त्यासाठी ३५० कोटीची तरतूद करण्यात आली आहे. समुद्रमार्गे जाणाऱ्या या रस्त्यासाठी केंद्र शासनाचेसुद्धा सहकार्य मिळणार आहे.

उंच पूल बांधताना जमिनीची पायलिंग टेस्ट केली जाते. यंत्राच्या सहाय्याने शंभर फूट खोल जमिनीच्या आत सापडणाऱ्या वस्तूंचे प्रयोगशाळेत टेस्टिंग केले जाते. पुलाचा तेथील जमीन सहन करेल की नाही यासाठी पायलिंग टेस्ट खूप महत्त्वाची मानली जाते. सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत विशेष प्रशिक्षित पायटेस्ट करणाऱ्यांकडून हे काम केले जात आहे. मुरूड तालुक्यातील नांदगाव येथील नागेश्वरनगर ते नवीन मजगाव या ठिकाणी तीन किलोमीटर लांबीचा पूल बांधण्यात येणार आहे. त्यासाठी नांदगाव परिसरात तीन ठिकाणी ही पायलिंग टेस्ट करण्यात येणार आहे.



## विनयभंगप्रकरणी तब्बल तीन वर्षांनी गुन्हा दाखल

**महाड : प्रतिनिधी**

रेल्वेमध्ये प्रवास करणाऱ्या एका महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी एका प्रवाशाविरोधात महाड तालुका पोलीस ठाण्यात तब्बल तीन वर्षांनंतर गुन्हा दाखल झाला आहे.

महाड तालुका पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार २०१९ मध्ये कोकण रेल्वेच्या श्री नेलवेली एक्स्प्रेसमधून केरळमधील एक महिला प्रवास करत होती. गाडी वीर स्थानकाजवळ आली असताना तेजस के. एस (वय ४१, रा. इल्लांजी, एर्नाकुलम, केरळ) याने सदर महिलेजवळ असभ्य आणि अश्लील शब्द बोलल्याप्रकरणी सुरुवातीला रत्नागिरी आणि त्यानंतर पनवेल येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता, मात्र दोन्ही प्रवासी हे केरळी असल्याने सदर घटना कोणत्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली याचा शोध लावण्यास पोलिसांना तब्बल तीन वर्षे लागली. त्यानंतर पनवेल येथून हा गुन्हा १४ जानेवारी २०२२ रोजी महाड तालुका पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला आहे. अधिक तपास महाड तालुका पोलीस ठाण्याचे सहाय्यक फौजदार ए. एस. साळवी करीत आहेत.

# काळसुरीमध्ये १०० टक्के लसीकरण | म्हसळे तालुक्यातील पहिली ग्रामपंचायत

**म्हसळा : प्रातिनिधी**

शंभर टक्के कोविड प्रतिबंधक लसीकरण झालेली काळसुरी ही म्हसळा तालुक्यातील पहिली ग्रामपंचायत ठरली असल्याचे मेंदडी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय आधिकारी डॉ. पूजा डोंगरे यांनी सांगितले.

कोरोनाची संभाव्य तिसरी लाट येऊ नये यासाठी १८ वर्षांवरील नागरिकांचे लसीकरण करून घेण्यात आले. त्यानंतर शासनाने १५ ते १८ वयोगटातील किशोर वयीन मुलांचे लसीकरण सुरू केले आणि बघता बघता सर्वांच्या सहकार्याने काळसुरी ग्रामपंचायत हद्दीत १०० टक्के कोविड प्रतिबंधत्मक लसीकरण झाले.

१५ ते १८ वयोगटातील किशोरवयीन मुलांचे शाळेतच लसीकरण केले. तसेच सरपंच, केंद्रप्रमुख, स्थानिक शिक्षक, सर्कल, तलाठी, अंगणवाडी सेविका, मदतनीस, पोलीस पाटील, कोतवाल, यांच्या सहकार्याने संपूर्ण ग्रामपंचायत हद्दीत लसीकरणाबाबत केलेल्या जनजागृतीमुळे हे यश आल्याचे सरपंच अरुणा नाक्ती यांनी सांगितले.

मेंदडी प्राथमिक आरोग्य केंद्रा अंतर्गत मेंदडी, वारळ, खरसई ही तीन उपकेंद्र, १० ग्रामपंचायती आणि १६ गाव, वाड्या येतात. त्यामध्ये तोंडसुरे, रेवली, तुरुंबाडी, रोहिणी या ग्रामपंचायत हद्दीत ९५ टक्क्यांपेक्षा जास्त कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण झाले आहे. तर वरवटणे, खरसई, मेंदडी, गोंडघर वारळ या ग्रामपंचायती अजून काही प्रमाणात लसीकरणात मागे आहेत. तालुका आरोग्य आधिकारी प्रशांत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाने उर्वरीत लक्ष्य पूर्ण करण्यात येईल, असे डॉ. पूजा डोंगरे यांनी सांगितले.



(छाया : संजय खांबेटे)

*लसीकरणाचे शिलेदार*

*डॉ. प्राजक्ता पोटे, डॉ चारुशीला गायकवाड, विमल पोटफोडे, दीपिका दिवेकर, दीपिका वाणी, प्रविणा ढंगारे, अरुण कोल्हे, निवळकर, जयकृष्ण वेटकोळी, बंडू ढोले, बाळकृष्ण पाटील, दीपेश अंदेकर, योगेश पालेकर, कृष्णा पाटील.*

## सायकलवरून ३० दिवस महाराष्ट्रभर भ्रमंती

### मोगलवाडीच्या अविनाश पाटलांचे जंगी स्वागत

**खालापूर : प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धनासाठी महाराष्ट्रभर सायकलवरून जनजागृती करणाऱ्या मोगलवाडी गावातील अविनाश पाटील याचे गुरुवारी (दि. १३) खोपोलीत जंगी स्वागत करण्यात आले. 'काम करा लाख मोलाचे, निसर्ग आणि त्याच्या संवर्धनाचे' हे बोधवाक्य घेऊन अविनाश याने राज्यात सायकलवरून तीन हजार किलोमीटर प्रवास केला आणि पर्यावरण संवर्धनाविषयी जनजागृती केली.

खोपोली फाटा येथील छत्रपती शिवाजी महाराजाच्या स्मारकाला अभिवादन करून अविनाश पाटील याने १४ डिसेंबर २०२१ रोजी सायकल प्रवासाला सुरू केली होती. अलिबाग, महाड मार्गे कोकण, कोल्हापूर, जळगाव, नाशिक, धुळे, नंदुरबार, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, अमरावती, नांदेड, मुंबई, ठाणे या जिल्ह्यातून सुमारे तीन हजार किलोमीटरचा प्रवास ३० दिवसात पूर्ण करून अविनाश पाटील गुरुवारी खोपोली आला. येथील छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला अभिवादन करून त्याने प्रवासाची सांगता केली. या वेळी त्याच्या स्वागतासाठी नगरसेवक मोहन औसरमल, सुनील पाटील, अमोल जाधव, बांधकाम व्यवसायिक खेमंत टेलर, सामाजिक कार्यकर्ते संदीप पाटील, प्रदीप देशमुख, अमित पाटील, अतिष धामणकर, विकी शिगवण, संदेश शेट्ये, कल्पेश लोवंशी, रविंद्र म्हात्रे यांच्यासह एकता रिक्षा संघटना, स्वराज मित्र मंडळ, एकवीरा मित्र मंडळ आणि श्री प्रतिष्ठानचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



(छाया : अरूण नलावडे)

# 'अवकाळी'नंतर रोगाचा प्रादूर्भाव

## रोहा तालुक्यातील मिरची उत्पादक शेतकरी हैराण

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील बाहे हे गाव मिरची उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे. यंदाही या गावातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात मिरची पिकाची लागवड केली होती, पण अवकाळी पावसानंतर आता मिरची पिकावर मर रोगाचा प्रादूर्भाव झाल्याने शेतकरी हैराण झाले आहेत.

कुंडलिका नदीच्या तिरावर बाहे गावातील शेतकऱ्यांनी यावर्षीदेखील सुमारे १५०-२०० एकर क्षेत्रावर मिरची लागवड केली आहे. पारंपरिक पद्धतीला फाटा देत या वेळी बाहे गावातील काही शेतकऱ्यांनी मल्चिंग पेपर व ठिबक सिंचनाचा वापर करून मिरची लागवड केली आहे. यावर्षी अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. आता मिरचीवर मर रोगाचा प्रादूर्भाव झाला आहे. रोहा पंचायत समितीचे कृषि विस्तार अधिकारी मिलिंद देवकर आणि अशोक दांडेकर यांनी मर रोगाचा प्रादूर्भाव झालेल्या क्षेत्राची पाहणी करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.



(छाया : महादेव सरसंबे)

जमिनीतील जास्तीचा ओलावा, हवेतील आर्द्रता व सध्याचे ढगाळ वातावरण यामुळे मर रोगाचा प्रादूर्भाव होत असल्याचे त्यांनी सांगितले.

मर रोगांवर नियंत्रण ठेवण्यासाठी शेतकऱ्यांनी रोगप्रतिबंधक जातींची लागवड करावी, सातत्याने मर रोग येणाऱ्या शेतात पिकांची फेरपालट करावी, तीन वर्षांपर्यंत वांगी कुळातील पिके (वांगी, टोमॅटो, मिरची) एकाच शेतात वारंवार घेऊ नयेत, शिफारस केलेल्या औषधांची झाडांना तत्काळ आळवणी (ड्रेंचिंग) करून घ्यावी, तसेच मल्चिंग पेपर व ठिबक सिंचनाचा वापर करण्याचा सल्ला कृषी विस्तार अधिकारी मिलिंद देवकर यांनी या वेळी शेतकऱ्यांना दिला.

या वेळी बाहे गाव व परिसरातील भाजीपाला व मिरची उत्पादक शेतकरी खेळू थिटे, संतोष थिटे, राजेंद्र शिंदे, लिंबाजी थिटे, मधुकर थिटे, सतीश जाधव, राजेंद्र थिटे, उमाजी कोंडे, विठोबा थिटे, भरत बामगुडे, विनोद थिटे, यांच्यासह मिरची उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तासगाव आदिवासीवाडीतून तरुणी बेपत्ता

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील तासगाव आदिवासीवाडी येथून बुधवारी पहाटे १९ वर्षीय तरुणी बेपत्ता झाल्याने तिच्या नातेवाईकाने माणगाव पोलीस ठाण्यात मुलगी बेपत्ता झाल्याची फिर्याद दाखल केली आहे.

हनुमंत शंकर वाळेकर (वय ४२, रा. तासगाव आदिवासीवाडी, ता. माणगाव) यांची मुलगी १९ वर्षीय मुलगी बुधवारी पहाटेच्या सुमारास कोणाला काहीही न सांगता घरातून निघून गेली, ती अद्यापपर्यंत परत आलेली नाही. तिची उंची पाच फूट, नाक सरळ, चेहरा गोल, अंगाने मजबूत, केस काळे, अंगात नेसूस चॉकलेटी रंगाचा पंजाबी ड्रेस, पायात लाल रंगाची सँडल, पायात चांदीचे पैंजण आहेत. नातेवाईकांनी सर्वत्र शोध घेतल्यानंतर शुक्रवारी मुलगी हरविल्याची तक्रार माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास सहाय्यक फौजदार तोरवे करीत आहेत. दरम्यान सदरची मुलगी कोणाला आढळल्यास तापसिक अंमलदार सहाय्यक फौजदार तोरवे (मोबाईल नं.९८८१६५२९२४) यांच्याकडे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटिसीव्दारे कळविण्यात येते कि. खालील परिशिष्ट 'अ' मध्ये वर्णन केलेला भुखंड प्रस्तावित १. श्री . नथु पदु शेळके २. श्रीमती भिमाबाई गणपत शेळके ३. श्री . विजय पांडुरंग भोपी ४. श्री . गणेश पांडुरंग भोपी ५ . श्रीमती .बेबी दत्तात्रेय भोपी ६. श्री . प्रल्हाद दत्तात्रेय भोपी ७. श्री . सुरज दत्तात्रेय भोपी यांच्या मालकी हक्काची. ताबेकब्जातील असुन आमचे पक्षकार यांनी सदर भुखंड विकसनासाठी घेण्याचे ठरवले आहे. तरी सदर भुखंड मालकी हक्काबाबत खात्री करून घेणेकरीता प्रस्तुत जाहिर नोटिस प्रसिध्द करीत आहोत . सदर भुखंड चे वर्णन खालिल प्रमाणे :

**परिशिष्ट 'अ'**

**भुखंड वर्णन**

| नोड | भुखंड क्र | सेक्टर क्र | क्षेत्र चौ .मी |
|---|---|---|---|
| कामोठे | ३४ | ५ | २४९ .७२ |

प्राप्त परिस्थिती वरील परिशिष्ट 'अ' नमुद भुखंड मध्ये वा कोणत्याही भागावर कोणत्याही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करारमदार. गहाण. दान. बक्षिस. फरोक्त तारण भाडेकरूपणाचा. हक्क पोटगी. समजोता करार अखत्यारपत्र. एम . ओ . यु वा तत्सम कोणतेही दावे. मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी व संबंधितांनी हि नोटिस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत आपल्या हक्क हितसंबंधांचे स्वरूप विशद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येऊन भेटावे. वरील कोणाकडुन काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर भुखंड निर्वेध व बोजाविरहित असुन त्यावर कोणताही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजुन आमचे पक्षकार सदर भुखंड विकसनाचे काम सुरू करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपुर्वक सोडुन दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १५/०१/२०२२
ठिकाण पनवेल

सही/-
**ॲड . कांचन . एस . पाटील**
बी . ए . एलएल . बी .
पत्ता :-१३३७ बी रूम नं २ शिवाजी पाटील निवास.
प्रभु आळी. जुने पनवेल जि. रायगड. ४१० २०६ .
फोन : ८६८९८०९८९६/८१०८८८२६११


# मासळी मिळत नसल्याने मुरूडमधील होड्या किनाऱ्यावर

**मुरूड : प्रतिनिधी**

अवकाळी पाऊस व बदलणारे हवामान यामुळे समुद्रात मोठ्या प्रमाणात मासळी मिळणे फार मुश्कील झाले आहे. आठ ते दहा दिवस खोल समुद्रात जावूनही पुरेशी मासळी मिळत नसल्याने मुरूड तालुक्यातील बहुसंख्य मच्छीमारी होड्या किनाऱ्यावर उभ्या आहेत.

चक्रीवादळ, जोरदार वाहणारे वारे, अवकाळी पाऊस यामुळे निसर्गाचा समतोल बिघडला असून समुद्रातील मासळी खूप दूरवर निघून गेली आहे. मागील दोन वर्षापासून समुद्रात मासळी मिळेनाशी झाली आहे. त्यामुळे मच्छीमार हताश झाले आहेत. मुरूड तालुक्यात छोट्या व मोठ्या अशा एकूण ६५० होड्या असून त्यापैकी निम्म्यापेक्षा जास्त होड्यांनी किनारा गाठला आहे.



(छाया : संजय करडे)

# पुजारा, रहाणेला आगामी मालिकेत मिळणार डच्चू?



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

फलंदाजांच्या अपयशामुळे भारतीय संघाला दक्षिण आफ्रिकेत ऐतिहासिक कसोटी मालिका जिंकता आली नाही. चेतेश्वर पुजारा आणि अजिंक्य रहाणे या दोन अनुभवी फलंदाजांना त्यांची संघातील जागा टिकवून ठेवण्यासाठी ही अखेरची संधी होती, पण त्यात ते अपयशी ठरले.

दुसऱ्या कसोटीच्या दुसऱ्या डावात या दोघांनीच टीम इंडियाचा डाव सावरला हे खरे असले तरी त्या धावा संघाला विजय मिळवून देण्यासाठी पुरेशा ठरल्या नाहीत. तिसऱ्या कसोटीत जेव्हा खरी गरज होती तेव्हाही हे दोघे अपयशी ठरले. आता या दोघांना पुढील कसोटी मालिकेतून संघातून वगळण्यात येणार असल्याचे वृत्त वृत्तसंस्था पीटीआयने दिले आहे. त्यामुळे या दोघांना आता कमबॅक करायचे असेल तर स्थानिक क्रिकेटमध्ये चांगली कामगिरी करावी लागेल.

पुजारा व रहाणे यांना घरच्या मैदानापाठोपाठ परदेशातही चांगली कामगिरी करता आलेली नाही. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या या मालिकेत पुजाराने सहा डावांत १२४ धावा केल्या आहेत, तर रहाणेला सहा डावांत १३६ धावा करता आल्या आहेत. पुजाराची मागील १२ महिन्यांतील कामगिरी पाहिल्यास त्याने १५ सामन्यांत २५.२९च्या सरासरीने ६८३ धावा केल्या आहेत रहाणेनं १४ सामन्यांत २०.८४च्या सरासरीने ५२१ धावा केल्या आहेत. या दोघांव्यतिरिक्त मयांक अग्रवाल यालाही काही खास करता आलेले नाही.

भारताची पुढील कसोटी मालिका घरच्या मैदानावर श्रीलंकेविरुद्ध आहे. या मालिकेत रहाणे व पुजारा यांना संधी मिळण्याची शक्यता कमीच आहे, तर याच मालिकेतून रोहित शर्माचेही कमबॅक होणार आहे.

रहाणे व पुजारा यांच्या अनुपस्थितीत शुबमन गिल याला मधल्या फळीत खेळण्याची संधी दिली जाऊ शकते, तर दुसऱ्या स्थानासाठी हनुमा विहारी किंवा श्रेयस अय्यर यांच्यापैकी एकाची निवड होऊ शकते, असे म्हटले जात आहे.

# फलंदाजीतील हाराकिरीवर कर्णधार कोहली नाराज

## द. आफ्रिकेतील पराभवानंतर बदलांचे संकेत

**केपटाऊन : वृत्तसंस्था**

ठरावीक डावांनंतर फलंदाजीत होणाऱ्या घसरगुंडीकडे दुर्लक्ष करणे अशक्य असल्याचे विधान भारताचा कर्णधार विराट कोहलीने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध तिसऱ्या कसोटीतील पराभवानंतर केले. यातून त्याने फलंदाजीत बदलांचे संकेतही दिले आहेत.

‘फलंदाजीबाबत आम्हाला अधिक विचार करावा लागणार आहे, यात शंका नाही. ठरावीक डावांनंतर फलंदाजांची हाराकिरी संघाच्या दृष्टीने अनुकूल नाही. आम्हाला याकडे दुर्लक्ष करता येणार नाही,’ असे कोहली म्हणाला. पहिल्या कसोटीतील पराभवानंतर आफ्रिकेच्या संघाने दमदार पुनरागमन केले. याबाबत यजमानांचे कौतुक



करतानाच त्याने भारतीय संघाकडून काही चुका झाल्याचेही मान्य केले. ‘आम्ही पहिल्या सामन्यात उत्कृष्ट खेळ केला. त्यानंतरच्या दोन्ही कसोटीत आफ्रिकेच्या गोलंदाजांनी मोक्याच्या क्षणी भेदक मारा केला. आम्ही लक्षपूर्वक खेळ करण्यात कमी पडलो आणि आफ्रिकेने याचा फायदा घेतला. त्यांनी ही मालिका जिंकणे हा योग्यच निकाल आहे,’ कोहलीने नमूद केले.

चेतेश्वर पुजारा आणि अजिंक्य रहाणे या अनुभवी भारतीय फलंदाजांनी आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत निराशाजनक कामगिरी केली. या दोघांना मागील दीड-दोन वर्षांत धावांसाठी झगडावे लागल्याने त्यांचे कसोटी संघातील स्थान धोक्यात आले आहे, मात्र कर्णधार कोहलीने त्यांच्या भविष्याबाबत काहीही स्पष्टपणे बोलणे टाळले. पुजारा आणि रहाणेच्या जागी युवा खेळाडूंना संधी देण्याची वेळ आली आहे का, असे विचारले असता कोहली म्हणाला, ‘भविष्यात काय होणार हे मी आताच सांगू शकत नाही. हे निर्णय माझ्या हातात नाहीत. तुम्ही हे प्रश्न निवडकर्त्यांना विचारा. ते काय निर्णय घेणार हे मला इथे बसून सांगणे अवघड आहे.

## विराटच्या ‘त्या’ कृत्यावर गंभीर भडकला

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**


केपटाऊनमध्ये खेळल्या गेलेल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तिसऱ्या कसोटीत टीम इंडियाचा कर्णधार विराट कोहलीला एका गोष्टीवरून राग अनावर झाला. त्याच्या वागण्यावर टीम इंडियाचा माजी सलामीवीर गौतम गंभीरने प्रतिक्रिया दिली आहे.


भारताचा फिरकीपटू रविचंद्रन अश्विन द. आफ्रिकेच्या दुसऱ्या डावातील २१वे षटक टाकत होता. त्याचा चेंडू डीन एल्गरच्या पॅडला लागला. अंपायरने त्याला आऊट दिले. एल्गरने या निर्णयाला आव्हान दिले. रिप्लेमध्ये तो नाबाद ठरला. या घटनेनंतर विराट संतापला. तो स्टम्प माइकच्या जवळ जाऊन बडबडला. यावर गौतम गंभीर म्हणाला, विराट कोहली खूप अपरिपक्व आहे. असा कॅप्टन तरुणांसाठी कधीही आदर्श बनू शकणार नाही.

# इंडियन ओपन बॅडमिंटन स्पर्धा; सिंधू, लक्ष्य उपांत्य फेरीत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दोन ऑलिम्पिक पदकविजेती पी. व्ही. सिंधू आणि जागतिक कांस्यपदक विजेता लक्ष्य सेन यांनी शुक्रवारी इंडिया ओपन बॅडिमटन स्पर्धेत शानदार विजयांची नोंद करीत अनुक्रमे महिला आणि पुरुष एकेरीची उपांत्य फेरी गाठली आहे.





महिला एकेरीत अग्रमानांकित आणि माजी विश्वविजेत्या सिंधूने ३६ मिनिटांत २१ वर्षीय अश्मिताला २१-७, २१-१८ असे पराभूत केले. उपांत्य फेरीत हैदराबादच्या २६ वर्षीय सिंधूचा थायलंडच्या सहाव्या मानांकित सुपानिडा कॅटरथाँगशी सामना होणार आहे. सिंगापूरच्या तिसऱ्या मानांकित येओ मिनने आजारपणामुळे माघार घेतल्याने सुपानिडाला पुढे चाल मिळाली. याआधी २०१९च्या राष्ट्रीय स्पर्धेत सिंधूने आसामच्या अश्मिताला नामोहरम केले होते.

आकर्षी कश्यपने मालविका बनसोडची झंझावाती वाटचाल २१-१२, २१-१५ अशी रोखली. तिची उपांत्य फेरीत थायलंडच्या द्वितीय मानांकित बुसानन ओंगबामरुंगफानशी गाठ पडणार आहे. पुरुष एकेरीत एक तास चाललेल्या उपांत्यपूर्व लढतीत तिसऱ्या मानांकित लक्ष्यने आठव्या मानांकित एचएस प्रणॉयवर १४-२१, २१-९, २१-१४ असा संघर्षपूर्ण विजय मिळवला. लक्ष्यचा उपांत्य फेरीत मलेशियाच्या एनजी झे यंगशी सामना होईल.

पुरुष दुहेरीत भारताच्या द्वितीय मानांकित सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी जोडीने सिंगापूरच्या ही यंग काय टटेरी आणि लो कीन हीन जोडीचा ३९ मिनिटांत २१-१८, २१-१८ असा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. याचप्रमाणे इशान भटनागर आणि साईप्रतीक के. या जोडीने फक्त १९ मिनिटांत मलेशियाच्या तिसऱ्या मानांकित ओंग येव सिन व टेवो ई यि जोडीविरुद्ध ७-२१, ७-२१ अशी हार पत्करली. मिश्र दुहेरीत आठव्या मानांकित वेंकट गौरव प्रसाद आणि जुही देवांगन जोडीचा मलेशियाच्या चेन टँग जी आणि पेक येन वेई जोडीसमोर निभाव लागला नाही. वेंकट-जुहीने १०-२१, १३-२१ अशा फरकाने सामना गमावला.

# राज्य अजिंक्यपद शरीरसौष्ठव स्पर्धेसाठी अनिकेत पाटीलची निवड



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

७१व्या राज्य अजिंक्यपद शरीरसौष्ठव स्पर्धेसाठी पनवेल तालुक्यातील दिघाटी येथील शरीरसौष्ठवपटू अनिकेत जनार्दन पाटील याची निवड झाली आहे. ही स्पर्धा रविवारी (दि. २३) औरंगाबाद येथे होणार आहे.

युवा शरीरसौष्ठवपटू अनिकेत पाटील याने उरण द्रोणागिरी येथे झालेल्या शरीरसौष्ठव स्पर्धेत प्रथम, तर अलिबाग व मोहोपाडा येथे द्वितीय क्रमांक पटकावून आपली छाप उमटविली आहे. आता तो रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करून राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी सज्ज झाला आहे.





पनवेल : हिंदू धर्मात मकरसंक्रांत सणाला विशेष महत्त्व आहे. हा सण शुक्रवारी सर्वत्र साजरा झाला. त्यानिमित्त नगरसेविका दर्शना भोईर, कुसुम म्हात्रे आणि भाजप नेते रवींद्र म्हात्रे यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना तीळगूळ देऊन शुभेच्छा दिल्या.



पनवेल : भाजपचे उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या विशेष प्रयत्नाने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा करून केंद्रीय रस्ते विकास निधी अंतर्गत कोन-सावळे रस्ता काँक्रिटीकरणासाठी २० कोटी रुपये मंजूर झाले असून या कामाचा शुभारंभ नुकताच झाला. या कामाची भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी पाहणी करून ठेकेदारांना दर्जेदार काम करण्याची सूचना केली. या वेळी युवा नेते अविनाश गाताडे, अनिल पाटील, योगेश लहाने, महेंद्र गोजे, सतीश साठे, राजेश लबडे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# अंडर १९ वर्ल्डकपसाठी युवा टीम इंडिया सज्ज

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

युवा टीम इंडिया ही अंडर १९ वर्ल्डकप २०२२च्या स्पर्धेत दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या लढतीने सुरुवात करेल. आशियाई चॅम्पियन पुन्हा एकदा वर्ल्ड चॅम्पियन होण्याच्या इराद्याने मैदानात उतरेल. वेस्ट इंडिजमध्ये सुरू असलेल्या स्पर्धेत युवा टीम इंडिया प्रबळ दावेदारापैकी एक आहे. या स्पर्धेपूर्वी संयुक्त अरब अमिरात म्हणजेच यूएईमध्ये झालेल्या अंडर १९ आशियाई कप स्पर्धेचे जेतेपद पटकावले होते. त्यामुळे युवा टीम इंडियाचे पारडे जड मानले जात आहे.

यश धुलच्या नेतृत्वाखालील संघ या स्पर्धेत ब गटात आहे. भारताच्या गटात युगांडा, दक्षिण आफ्रिका आणि आयर्लंड या संघांचा समावेश आहे. चार गटांत चार संघ असे एकूण १६ संघ जेतेपदासाठी रिंगणात उतरणार आहेत. चार ग्रुपमधील टॉपचे दोन संघ प्लेऑफसाठी पात्र ठरतील. साखळी फेरीतील सामने हे २२ जानेवारीपर्यंत खेळवण्यात येतील. २५ जानेवारीपासून प्लेट ग्रुप मॅचला सुरुवात होईल. ५ फेब्रुवारीला या स्पर्धेतील अंतिम सामना खेळवण्यात येणार आहे. भारताच्या गटातील युगांडा पहिल्यांदाच या स्पर्धेत भाग घेत आहे.

आयसीसी अंडर-१९ वर्ल्डकप स्पर्धेत भारतीय संघाने आपला दबदबा राखला आहे. आतापर्यंत २०००, २००८, २०१२ आणि २०१८ या वर्षी झालेल्या स्पर्धेत युवा टीम इंडियाने जेतेपद पटकावले होते. याशिवाय २०१६मध्ये युवा टीम इंडियाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते.

आयसीसी अंडर-१९ वर्ल्डकप २०२२ स्पर्धेत भारत १५ जानेवारी रोजी गुयानाच्या प्रोविडेंस स्टेडियमवर मैदानात उतरले. सलामीच्या लढतीत त्यांच्यासमोर दक्षिण आफ्रिका संघाचे आव्हान असेल. भारताचा दुसरा सामना त्रिनिदादच्या ब्रायन लारा स्टेडियमवर १९ जानेवारीला आयर्लंड आणि याच मैदानात २२ जानेवारीला टीम इंडिया युगांडासोबत भिडेल.

वेस्ट इंडिजमध्ये खेळल्या जात असलेल्या या स्पर्धेतील साखळी फेरीतील सर्व तीन लढती भारतीय प्रमाणवेळेनुसार सायंकाळी ७:३० वाजता सुरू होतील. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील सामन्याशिवाय स्पर्धेत इतर सामनेही याच वेळेत रंगणार आहेत.

# कामगार प्रीमियर लीगला लाभला उत्स्फूर्त प्रतिसाद

## राजू देसाई अष्टपैलू खेळाडू, किरण अमृते मालिकावीर



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई पूर्व उपनगरात विक्रोळी येथे २३ एकर जागेत वसलेली टुमदार बंगल्याची नारळांच्या विस्तीर्ण सानिध्यात वसलेली वसाहत. या वसाहतीच्या मैदानात दरवर्षी भरवली जाणारी स्पर्धा म्हणजे केपीएल (कामगार नगर प्रीमियर लीग). मुंबई क्रिकेटचे माहेरघर असलेली व एकापेक्षा एक क्रिकेटपटू मुंबईला देणारी अशी कामगार नगर कॉलनी. दरवर्षीप्रमाणे यंदाही ज्येष्ठ खेळाडूंसाठी (५० वर्ष व त्यापुढील खेळाडूंसाठी) ५०+ क्रिकेट स्पर्धा भरविण्यात आली. या स्पर्धेला प्रचंड प्रतिसाद मिळाला व ज्येष्ठ क्रिकेटपटूंनी आपला दर्जा व फिटनेस पुन्हा एकदा सिध्द केला.

तीन संघांत लीग पद्धतीने सामने खेळवण्यात आले. प्रत्येक संघाला दोन सामने रंगले. संघांचे कर्णधार होते गजानन वावीकर, पुरुषोत्तम पोवळे व हेमंत जुईकर. स्पर्धेचे अंतिम विजेतेपद रायलकिंग संघास गजानन वावीकर यांच्या कुशल नेतृत्वाने मिळाले. सुधीर गावडे व प्रमोद सावंत यांनी उत्तम फलंदाजी केली, तसेच राजू देसाई यांनी उत्तम गोलंदाजी व फलंदाजी करुन अष्टपैलू कामगिरी करीत स्पर्धेचे सर्वोत्तम गोलंदाज व सुधीर गावडे यांना सर्वोत्तम फलंदाजाचे पारितोषिक मिळाले.

इतर संघातील खेळाडूंनीही चांगले प्रदर्शन करुन सामन्यात रंगत आणली. हेमंत जुईकर, पंकज हिवाळकर, पुरुषोत्तम पोवळे यांनीसुद्धा कुशल नेतृत्व केले. किरण अमृते यांना मालिकावीर पारितोषिक देण्यात आले.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com